म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : काव्य
दा. क्र. : ३३८६
IRBK-0103386
IRBK-0103386

६१०९१७०
३३८६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नागपूर प्रकाशन क्र. — अनुक्र. ३३८५ ........ नों. दि ..........
वि. ......... क्र. ..................

संगीत

# पहिला कवि

लेखक—

सी. म. बापट
साहित्य विशारद

३००१८
अनु. .........
वि. क्र. .........
क्र. क्र. २९.८८.....
नों. दि. .........

प्रस्तावनाकार:—

प्राध्यापक, वि. मा. दी. पटवर्धन.
कर्नाटक कॉलेज, धारवाड

१९५० ]

नागपूर प्रकाशन

[ किंमत १॥। रुपये

प्रकाशक—
**दि. मा. धुमाळ,**
नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर.

पहिली आवृत्ति—आगस्ट १९५०
सर्व हक्क लेखकाधीन

मुद्रक—
**ल. म. पटले,**
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सीताबर्डी, नागपूर.

# तिसरी घंटा

लुटारू म्हणून जगणारा वाल्या कोळी कांही युक्तिवादामुळें एकाएकीं हृदय-पालट होऊन कवि बनला, ही पुराणांतरींची घटना मला लहानपणीं नेहमींच अद्‌भुत वाटे. बरें, नारद नांवाच्या त्या भटक्या भगवद् भक्ताचा युक्तिवाद तरी असा काय मोठा बिनतोड होता ? वाटे कीं, आम्हांला एखादा चोर लुवा-डायला आला असतां तर आम्ही नसती कां अशी अक्कलहुशारी लढविली ?

पण लवकरच कळून चुकलें कीं, हल्लींचे डाकूही निराळे आणि त्यांच्या पापपुण्याच्या कल्पना निराळ्या. नारदाच्या वेदांताला आजचा डाकू भीक घालील हा सुतराम् संभव नाही. तरी पण या नाट्यपूर्ण घटनेवर एखादी नाटिका लिहितां येईल ही माझी कल्पना कायम होतीच, आणि म्हणून माझे मित्र श्री. सी. म. बापट यांच्या प्रभावी लेखणींतून ती 'पहिला कवि' या नांवानें कागदावर उतरलेली पाहतांच मला फार आनंद झाला.

कवि हा प्राणी सहसा गर्भश्रीमंतींत जन्मास येत नसून दारिद्र्याच्या वळचणीलाच तो आढळायचा. दुःखानं होरपळलेला आणि परिस्थितीनं गांज-लेला त्याचा जीव परपीडेविषयीं अधिक हळवा बनतो, आणि आपल्या काव्य स्फुलिंगानं तो चहूकडे मानवतेची मशाल पेटवितो. श्रीरामावताराची कथा लिहिण्याचं काम एखाद्या लब्धप्रतिष्ठित साहित्यिकाऐवजीं अनुभवानं पावन झालेल्या अशा एखाद्या कवीनं करावं, हा परमेश्वरी संकेत वाल्मिकीच्या कथेंत श्री. बापटांनीं चांगल्या तऱ्हेनं सूचित केला आहे.

द्रष्टेपणा हा जो अभिजात कवीचा जन्म स्वभाव तोहि वाल्मिकीच्या कथेंत स्पष्ट दिसून येतो. प्रत्यक्ष ... द्राच्या लीला

IRBK-0103386

केवळ कल्पनाशक्तीनं रंगविणं, हें कार्य प्रतिभासंपन्न कवीशिवाय दुसऱ्या कोणाला साधणार ? ज्या वेळीं जगाला ॲटम बॉंबची कल्पनाही नव्हती. त्यावेळीं ' शिलर ' कवीनं आपल्या एका कवितेंत प्रियाराधन करणाऱ्या एका प्रणयी वीराच्या तोंडीं पुढील शब्द घातले आहेत—" हे प्रिये, तुझ्याकरितां मी काय वरें करणार नाहीं ? मोठमोठ्या शास्त्रज्ञांनीं देखील अभेद्य ठरविलेला ॲटम् ( अणु ) मी फोडीन आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या शक्तीनं हें सारं जग अंतराळांत उडवून देईन ! " भावी समाजक्रांतीचं दर्शन आपल्या काव्यांतून घडविणारा कवी हा युगप्रवर्तक ठरतो. अर्थात् वाल्मिकी हा अशा कवींचा मूळ पुरुषच म्हटला पाहिजे.

" जें न देखे रवि, तें देखे कवि, " या म्हणीचा विपर्यास करून पुष्कळ वेळां कवीची कुचेष्टा केली जाते. कडी लावलेल्या दाराच्या फटीमधून जें पाहूं नये तें पाहणारा एक चावट प्राणी, येथपर्यंत कवीची कुचेष्टा होते. पण वरील म्हणीचा खरा आशय कोणता हें विशद करणारें एकच उदाहरण येथें देतो. प्रत्यक्ष रामायण घडलें आणि सीताहरण झालें, तेव्हां जे रामप्रभु खंबीरपणानं आपल्या शत्रूशीं सामना देत होते, तेच सीतादेवीसह अयोध्येस परत आल्यावर राज्याभिषेकोत्सवाच्या प्रसंगीं सीताहरणाचं नाटक पहात असतांना ढळढळा रडले. तोच प्रसंग आणि तींच पात्रें. पण त्यांवर कवीच्या प्रतिभेचे संस्कार झाले कीं, त्यांना एक निराळाच रंग चढतो आणि तीं अधिक भावनारूप बनतात. वाल्याचा वाल्मिकी झाला, हा साधा प्रसंग श्री. बापटांच्या कवित्व-शक्तीनं असाच रंगविल्या कारणानं तो प्रेक्षकाचं हृदय हलवून सोडण्या इतका परिणामकारक झाला आहे.

या नाटिकेंत नाट्यगुणांपेक्षांही वाङ्मयगुण अधिक प्रकर्षानं आढळतात. या जगांत कवीची भूमिका कोणती, तें विशद करण्याचं कार्य लेखकानं फार कौशल्यानं केलं आहे. " काव्य कां लिहायच ? " याचं उत्तर जर, —"माण-सांच्या अंतःकरणांतल्या मृदु भावना जागृत करून त्यांच्यांतील पशुत्व कमी व्हावं म्हणून"—असं असेल तर महाकवि वाल्मिकीनं रामायण निर्माण करून तें सार्थ

करून दाखविलं आहे. रामचरित्राची कथा म्हणजे अनेक रोमहर्षण प्रसंगांची एकत्र गुंफण आणि त्यांतला प्रत्येक प्रसंग जीवनाचीं नवीं मूल्यं तयार करणारा. अशा महाकाव्याच्या निर्मात्याचं मनोविकसन प्रस्तुत नाट्यकथेंत चांगल्या तऱ्हेनं रंगविलेलं दिसून येतं. ही एक तपश्चर्या आहे, आणि ती झाल्याविना प्रतिभा-संपन्न माणसाचं द्रष्ट्या कर्त्यांत रूपांतर होत नाही. अग्नींत तावून सुलाखून निघाल्याशिवाय सोन्याचा कस कसा चढेल ?

लेखकाचं भाषाप्रभुत्व असामान्य नसलं तरी तें मोहक खास आहे. संवाद कंटाळवाणे न होतां उलट रसोत्कर्षास साहाय्य करतात. सुंदर आणि नाविन्यपूर्ण कल्पना संभाषणाऱ्या ओघांत पेरून देण्याचं वापटांचं कौशल्य कौतुकास्पद आहे. या दृष्टीनं नाटकाचा दुसरा अंक फारच छान साधला आहे —" मासळीची चाहूल लागतांच बगळ्याची समाधी खाडकन् उतरते "-" फुलांच्या पाकळ्यांत लतेला तिचीं गोड स्वप्नं दिसत असतात. "—" मधुर स्मृतींच्या अमृतानं संसारांतल्या निराशेचं विष प्रेमी जीव पचवून टाकतो. "— इत्यादि रम्य कल्पनांचे तुषार या नाट्योद्यानांत विहरणाऱ्या वाचकाचा शीण नाहीसा करतात. साध्या सुबोध पण प्रासादिक रसवंतीची मोहक हिरवळही जागोजागीं दृष्टीस पडते.

" सुख वाटून घ्यायला सारे धावून येतात पण दुःखाला वाटेकरी कोणीच असत नाही. "—" प्रेमाच्या पाणपोईवर तिऱ्हाइताच्या हातानं पाणी पिऊन तहान भागत नाही. "--" पायांतल्या दगडांची कहाणी सूर्यकिरणांत झळक-णाऱ्या सुवर्ण कळसाला ऐकूं येत नाही. "—" पाण्यापासून लाट बाजूला करतां येईल काय ? " इत्यादि सुभाषितें या नाटिकेंत विपुल आहेत. विनोद सूक्ष्म असून तो रसहानी कोठेंच करीत नाही.--" पुढं मागं होणाऱ्या आणि न होणाऱ्या अवतारी कथा अगदी अवतार आल्या प्रमाणं लिहून काढतील म्हणजे अवतार घेण्याची गरज देखील भगवंतांना पडायची नाही. " असा शब्दावरचा कोटिक्रम क्वचित् असला तरी तो देखील मोठा रुचिर वाटतो.

नाटकाचें अखेरीस वाल्याची सत्वपरीक्षा ' रंभे ' कडून करविली नसती तरी चाललें असतें, अशी माझी समजूत आहे. ही सत्वपरीक्षा पाहण्याची खोड कांहीं देवांना आणि ऋषीवर्यांना होती हें खरें धरलें तरी, नाटकाच्या कथानकाला किंवा वाल्मिकीच्या स्वभावपरिपोषाला तिचा फारसा उपयोग होत नाही. फार तर एवढेंच म्हणतां येईल कीं वाल्मिकीच्या मनाची पातळी किती उंचावली होती, तें या प्रसंगावरून नाटककारास दाखवायचं होतं.

ज्या एका घटनेमुळें वाल्याचे मनश्चक्षू उघडतात, ती नाटकांतली मध्यवर्ती घटना चटकदार तऱ्हेनं रंगविली गेली आहे. पण तिला पूरक अशा घटना कथानकांत फारशा नसल्यामुळें कथासूत्र साहजिकच जरा तोकडें वाटतें. ही उणीव लेखकानं आपलं संवादलेखनाचं कौशल्य पणास लावून बरीच भरून काढली आहे.

नाटकांतल्या पहिल्या पदांत मूर्तिमंत काव्य भरलेलें दिसतें. रचना प्रसादपूर्ण पण सुटसुटीत, चाली सोप्या पण नादमधुर, आणि शब्दयोजना सहजसुंदर पण अर्थपूर्ण, असं या नाटकाच्या पद्यविभागाचं थोडक्यांत वर्णन करतां येईल. श्री. बापट हे मराठींतले एक नामवंत कवि असून " फुलांचे अश्रू " हा त्यांचा पहिला काव्यगुच्छ रसिकांकडून नांवाजला गेलेला आहे. तेव्हां एका कवीनं दुसऱ्या एका महाकवीची जन्मकथा लिहावयास घेतल्यामुळे लेखक आणि कथानायक यांचा या ठिकाणीं झालेला ' समसमां संयोग ' फार हृदयंगम वाटतो.

माझ्या मित्राचं हें पहिलंच नाटक आहे. रंगभूमीवर त्याचे कांही प्रयोग झाले असले तरी रंगभूमीच्या दरबारांत दबकत दबकत पाऊल टाकण्यापेक्षां जास्त सराईतपणा माझ्या मित्राजवळ नाही. वाचकांना ही त्याची कलाकृति सादर करतांना मी इतकेंच म्हणेन कीं, नाटक अत्यंत कळकळीनं आणि भावमधुर वाणीनं लिहिलं आहे, आणि लेखकाच्या भावी कलानैपुण्याची वानगी म्हणून आपल्यापुढं ठेवण्याइतकं तें खचित सुरस आहे.

'आपका' बंगला
आपटे रोड, पुणें ४, १ मे १९५० } वि. मा. दी. पटवर्धन

संगीत

# पहिला कवि

या नाटकाचा पहिला प्रयोग कोल्हापूरच्या 'नाटय कलामंदीर' नें तेथील पॅलेस थिएटरांत ता. ३-२-१९४५ रोजीं रात्रौ १० वाजतां केला.

# भूमिका

| | | |
|---|---|---|
| वाल्या कोळी | | भीमराव काळे |
| नारद | ... | मास्टर कृष्णराव अंबपकर बी. ए. |
| इंद्र | ... | श्रीनिवास जोशी |
| काळू | ... | भागवत |
| निळू | ... | निमकर |
| वहिरू | ... | कुमार मुरलीधर |
| हिरा | ... | सौ. वत्सला पाटील |
| तारा<br>रंभा | ... | शांता कुमारी |
| प्रतिहारी | ... | गायकवाड |

कै. काटवे गुरुजींच्या

पुण्यस्मृतीला

हें पुष्प समर्पण केलें आहे—

# एक होता लुटारू

तो चोरांचा पुढारी—लुटारूंचा राजा होता. वाटसरांच्या माना छाटतांना त्याच्या मनाला कांहीच वाटत नसे. एक वेळ फत्तरालाहि पाझर फुटला असता! त्याचा तो एक नित्याचा खेळच होता. त्याच्या मुखावर वाघाची उग्रता, नजरेंत कृष्णसर्पाची क्रूरता आणि बाहूंत वज्राचा कठिणपणा सामावला होता. जणूं काळ-पुरुषाची विक्राळ मूर्तीच!

त्याला जगाची पर्वा नव्हती. आपला आवडता उद्योग त्यानें अखंड चालू ठेवला. मारलेल्या माणसाची खूण म्हणजे एक खडा—अशा खूनखडयांनीं त्याचे सात रांजण काठोकाठ भरून गेले. बेडर वृत्तीनें पातकांचा गोतावळा आपल्या-भोंवती गोळा करीत तो राहिला. हेंच रक्तलांछित जीवन त्याच्या ललाटीं लिहिलें होतें काय?

परिस्थितीनें माणूस बनतो, त्याच प्रमाणें माणूस आपल्या कृतीनें परिस्थितो बनवितो. हेंहि तितकेंच सत्य आहे. असा एकादा विलक्षण क्षण येतो कीं, त्यानें मानवी जीवनाला अगदी वेगळें वळण लागतें. ती एकच घटना-पण तिनें वाल्या कोळ्याच्या जीवनांत केवढी क्रांती केली! लाल निखाऱ्याचा अमोल हिरा ठरला, विषाचें अमृत झालें. काय चमत्कार पहा! असत्याचा पुतळा, सत्याचा वाली झाला. एक निर्दय गळेकापू, कलेचा प्रेमळ पूजक बनला-दगडाचा देव झाला!

प्रकाशाला गिळूं पाहणारा गडद अंधार स्वतांच प्रकाशमय झाला आणि त्यांतून विशाल विश्वमंदिराला दिव्य शोभा देणारी सुंदर काव्यकला उदयाला आली.

एक मोठा लुटारू, महर्षि झाला आणि तोच जगाचा '**पहिला कवि**'!

—सी. म. बापट

२००९८
प्रा. वा
२९८८
३-४-५९

# अंक १ ला

## प्रवेश पहिला

( स्थळ—इंद्रसभा, इंद्र सिंहासनावर बसला असून रंभेचें नृत्यगीत चालूं आहे. )

[१]

रंभा— रुणझुण पैंजण वाजे
चंचल नयना नाचत ललना
स्वर्ग सुखाचा साजे ॥ धृ० ॥

शृंगार रसाची गंगा
उधळित ये दिव्य तरंगा
मधुर गीत रमवीत मनाला
नाद जगीं तो गाजे ॥ १ ॥

नवलाचा दिन हा दिसला
रसिकांचा राजा रमला
सुंदर पहिला रंग बहरतां
ही नवबाला लाजे ॥ २ ॥

( नृत्यगीत आटोपल्यावर अभिवादन करून रंभा बाजूला होते. मंद वीणानाद लांबून ऐकूं येत असल्याचा भास इंद्राला होतो. )

इंद्र—( विस्मयानें ) वीण्याचा हा मंजुळ नाद कुठून येत असावा ! आवाज तर अगदी ओळखीचा वाटतो. नारद मुनि तर इकडं येत नसतील ना !

बरेच दिवसांत त्यांची स्वारी या बाजूला वळली नाही. हो, बहुतेक तेच येत असावेत ! त्यांच्या सारख्या विरक्त पुरुषाला माझा हा दरबारी डामडौल कदाचित् रुचणार नाही. मीच स्वतां त्यांना सामोरा जावं हें उत्तम ! ( सिंहासनावरून खाली उतरतो. प्रतिहारी येतो )

प्रतिहारी—( मुजरा करून ) महाराजांचा जयजयकार असो !

इंद्र—( कांहीशा दिमाखानें ) काय वार्ता आहे ?

प्रतिहारी—देवर्षि नारद आपल्या भेटीला इकडंच येत आहेत. मी त्यांना लांबून ओळखून महाराजांना वर्दी द्यायला आलों.

इंद्र—त्यांच्याच आगमनाची मी वाट पहात आहे. लवकर जा आणि त्यांना आदरानं घेऊन ये.

प्रतिहारी—जशी आज्ञा महाराज ! ( मुजरा करून जातो. नारद भजन करीत प्रवेश करतो. इंद्र त्याला वंदन करतो. )

नारद—( हसत मुखानें ) देवेंद्रा, तुझा विजय असो !

इंद्र—( नम्रपणानें ) आपल्या पावन दर्शनानं मी आज धन्य झालों. या सेवकाला आपली काय आज्ञा आहे ?

नारद—या इंद्रपदापेक्षांहि तुझा हा विनय तुला अधिक शोभून दिसत आहे.

इंद्र—गेले कित्येक दिवस माझ्या मनाला एक प्रकारची रुखरुख लागून राहिली होती. पण ती काय असावी हें कांही केल्या मला उमगेना. आपल्या पुण्यमय प्रभावानं ती आज दूर झाल्याप्रमाणं मला वाटतंय. पृथ्वीचा संसार कसा काय चालला आहे ? आपला संचार तिन्ही लोकांत असतो. तेव्हा म्हटलं कांही नवल विशेष—

नारद—( हसत ) कसलं नवल अन् कसलं विशेष ! पण हें पहा, मानलं तर आहे अन् मानलं तर नाही. तुला काय म्हणा ! बोलून चालून तूं

पडलास राजा, आणि त्यांतून विलासी देवमंडळाचा अधिराजा. ना चिंता ना यातायात ! 'सुखंच मे शयनं च मे' असा तुझा कारभार. पृथ्वी बुडाली काय अन् तरली काय, तुला दोन्हीहि सारखंच. तुझ्या सारख्या भाग्यशाली श्रीमंताची काय नेहमीच दिवाळी. दारिद्र्याच्या आगींत होरपळून निघणाऱ्या मुक्या जिवाची तडफड, सोनेरी सावलींत विसावलेल्या सुखाजीला कशी कळणार ! मंद वायुलहरींनं मुरकणाऱ्या कोवळ्या पालवीला खालीं गळून पडलेल्या जुन्या पानांची आपुलकी वाटत नसते. आकंठ अमृत प्यावं अन् सुकुमार रूपवतींच्या सुंदर सहवासांत नवजीवनाचा आनंद लुटावा, सभासमारंभ नी सुखसोहाळे साजरे करावेत—

इंद्र—( अहंकाराने ) राजेपणाचा बोज कायम टिकून रहावा, तसाच आपल्या प्रजेचा उत्साह सदैव वाढता असावा म्हणून अशा गोष्टी करणं आम्हाला अवश्यमेव असतं. आणि आमच्या इभ्रतीच्या दृष्टीनं त्यांपासून झाला तर फायदाच होतो, असा आजवरचा आमचा अनुभव आहे.

नारद—( उपहासाने ) तुझा हा उपक्रम स्तुत्य आहे आणि त्याबद्दल तुझं अभिनंदन करावंसं मला वाटतं.

इंद्र—माझ्या प्रजेच्या हितासाठीं मी नेहमी डोळ्यांत तेल घालून बसलेला असतो.

नारद—तसा स्वभावानं तूं चांगला आहेस.

इंद्र—भूलोकावर अलिकडं आपण कधी गेला होता काय ? तिथली हालहवाल कशी काय आहे ?

नारद—(उपरोधी स्वरानें) पृथ्वीचं दुःख सुखी स्वर्गाला कसं कळणार !

इंद्र—( आश्चर्यानें ) कां कळूं नये ?

नारद—कळायला कांही हरकत नाही म्हणा ! पण तें तसं कळलं नाही हें मात्र खरं ! कारण तुझ्या या विचारण्यांतच पृथ्वीचा वनवास विलासी

स्वर्गाला समजला नाही हें स्पष्ट दिसून येत आहे. परदुःख शीतल असतं ! नुसते डोळे अन् कान उघडे ठेऊन भागत नाही. गरीबांच्या यातना ध्यानांत यायला मन जागं असावं लागतं. सभोंवार पसरलेल्या घायाळ जीवांचे पडसाद अजून तुझ्या हृदयाच्या गाभाऱ्यांत उमटले नाहीत. गरीबीची कळ श्रीमंतीला सहसा कळत नाही, या नियमाला तूं तरी कसा अपवाद असशील ! पायांतल्या दगडांची कहाणी सूर्यकिरणांत झळकणाऱ्या सुवर्ण कळसाला ऐकूं येत नाही. पण त्याच खालच्या खालीं खचून जाणाऱ्या मुक्या दगडांच्या रडण्यांत त्या कळसाचं मरण हसत असतं. पृथ्वीच्या पोटांत भडकलेली आग अगदी उंचावर असणाऱ्या स्वर्गाला अद्यापि पोंचू शकली नाही. परंतु ही आग साधी नसून, उभ्या विश्वाला जाळून टाकणाऱ्या प्रलय कालाचा हा उसळणारा अंगार आहे. त्यांतून तुझा स्वर्ग सुखरूप राहील असं कां तुला वाटतं ?

इंद्र—( चपापून ) मुनिवर्य ! तुम्ही सांगता आहां ही गोष्ट अगदी सत्य आहे कां ? का माझं मन बघण्यासाठीं तुम्ही ही कोलती पेटवून ठेवली आहे. अहो, असा भडाका उडायला एवढं झालंय तरी काय ? मानव लोक कसल्या संकटांत सापडला आहे—या वेळीं माझ्या मदतीचा कांही उपयोग होईल कां ?

नारद—(हसून) काय असतील नसतील ते प्रश्न एकच दमांत विचारून घे. मग मला जमल्यास अन् सुचल्यास त्यांचीं उत्तरं देण्याचा मी सावकाश प्रयत्न करून पाहीन. कारण सध्यां तुला काम नाही अन् मलाहि कुठं थारा नाही.

इंद्र—( आर्जवी स्वरानें ) तुम्ही मला असें बुचकळ्यांत पाडूं नका. कसलाहि आडपडदा न ठेवतां काय असेल तें अगदीं स्वच्छ सांगून टाका. भूमातेचं दुःख दूर करायला मी एका पायावर तयार आहे.

नारद—तुझा हा उत्साह आणि पृथ्वीच्या कल्याणाविषयीं तुला वाटणारी कळकळ पाहून माझं अंतःकरण आनंदानं कसं उचंबळून येतंय. खरोखर, पृथ्वीचं भाग्य थोर म्हणून तिला तुझ्यासारखा पराक्रमी पाठिराखा मिळाला पण—

इंद्र—( अधीरतेनें ) पण काय ? तुमच्या अशा अर्धवट बोलण्यानं मी अधिकच गोंधळून जात आहे. कोणत्या असुरानं पृथ्वीतलावर असा कहर मांडलाय ? त्याचं नांव तर मला कळूं द्या, म्हणजे एका क्षणांत त्याला होता कीं नव्हता असा करून टाकतो.

नारद—बाबा, जरा दमानं घे. नाहीतर, ‘ उतावळा नवरा अन् गुड-घ्याला बाशिंग ’ असा प्रकार व्हायचा. मानवांनीं तुम्हां देवांना आहुती द्याव्यात आणि तुम्ही त्या डोळे मिटून ग्रहण कराव्यात, हा तुमचा आजवरचा शिरस्ता. मोठेपणा हवा पण त्याबरोबर त्याला लागणारी जबाबदारी अंगावर घ्यायला नको. हें पृथ्वीचं संकट आतां इतकं वाढलं आहे कीं, तुझ्या पराक्रमाचा तिथं काडी इतकाहि उपयोग होणार नाहीं. आंतल्या आगीनं उतूं जाणाऱ्या पिसाट अन् अफाट सागराला किनाऱ्यावरचा बांध कितीसा अडवून धरील ! रानाला लागलेला वणवा चुळकाभर पाण्यानं विझत नसतो. असाध्य रोग बरा करायला असामान्य धन्वंतरीच हवा. तिथं ऐकाद्या वाटेवरच्या वैदूची मात्रा चालायची नाही.

इंद्र—( शरमून ) ही गोष्ट इतक्या विकोपाला गेली असेल याची मला मुळीच कल्पना नव्हती. हें ऐकून माझी छाती तर दडपून गेली आहे. आतां याला तोड काय ?

नारद—त्याच खटपटींत सध्यां मी गुंतलों आहे. भगवंतांची भेट घेऊन नुकताच मी वैकुंठाहून परत चाललों होतो. म्हटलं जातां जातां तुझाहि समा-चार घेऊन जावं म्हणून सहज इकड वळलों इतकंच.

इंद्र—भगवान् काय म्हणाले ?

नारद—या अनर्थामधून पृथ्वीची सोडवणूक करण्याला आणि दीनदुब-ळ्यांचा विस्कटलेला संसार सावरून धरायला ते लवकरच अवतार घेणार आहेत.

इंद्र—हें शुभ वर्तमान ऐकून मला फार आनंद होत आहे.

नारद—भूलोकावर राक्षसांचा पक्ष अत्यंत प्रबळ झाला आहे. अधर्म आणि अन्याय यांनी साऱ्या जीवांची ' दे माय धरणी ठाय ' अशी अवस्था करून सोडली आहे. स्वतां प्रगट झाल्याखेरीज जगाची मोडलेली घडी पुन्हां नीट बसणार नाही, असं प्रभूंचं स्पष्ट मत पडलं. परंतु त्या पूर्वी एक अवघड काम त्यांनीं माझ्यावर सोपविलें आहे. त्यामुळें माझ्या मनाला चैन नाही.

इंद्र—अशी कोणती गोष्ट आहे की, आपल्या सारख्या चतुरालाहि तिचा एवढा बाऊ वाटावा ?

नारद—( सचिंत मुद्रेनें ) भगवान् जो अवतार घेणार आहेत, त्या अवताराची आधीं समग्र कथा श्लोकरूपानं लिहिणारा कवि–पहिला कवि–शोधायला पाहिजे.

इंद्र—( मोठ्यानें हसून ) अं, अेवढंच ना ! मग त्यांत असं विचकण्यासारखं काय आहे ? निष्कारण राईचा पर्वत करून तुम्हीं तळमळत राहिला आहांत. तुमच्या बोलण्याची मला तर फारच मौज वाटते. तुमचा स्वभाव भारी विनोदी आहे बुवा !

नारद--( गंभीरपणानें ) ही गोष्ट अशी थट्टेवारी नेण्यासारखी नाही.

इंद्र—मला तर यांत कांहीच कठिण वाटत नाही. पायांतला कांटा काढायला पहार काय करायची ? अहो, कवींना हो काय तोटा ! या आमच्या अमरावती नगरींत कवींचा अेक भला जंगी कारखाना निघालाय, आणि एकेका रत्नाची कल्पनाशक्ति तरी काय प्रचंड म्हणतां. अगदी आकाशगंगेचा धबधबाच ! बोलायची म्हणून सोय नाही. एकाच अवताराची कथा ती काय ? पुढंमागं होणाऱ्या आणि न होणाऱ्या अवतारी कथा अगदी अवतार आल्याप्रमाणं तोंडपाठ लिहून काढून तुम्हांला या पेचप्रसंगांतून ते खास मोकळं करतील. एकवेळ नमुना तरी पहा ! अेक पंडित तर असा आहे म्हणतां कीं ज्याचं नांव तें ! त्यानं स्वतांचं डोकं चालवून एक भयानक मृत्युगीत रचलंय. अगदी वज्रच म्हणाना ! तें त्या बोकाळलेल्या दैत्यांना नुसतं वाचायला द्या. निदान त्यांतलीं

दोनचार अक्षरं त्यांच्या वाडलेल्या कानांवर पडतील असं करा. म्हणजे काय गंमत होते ती पहा तर खरी. अवतार घेण्याची गरज सुद्धा भगवंतांना पडायची नाही.

नारद—( वैतागानें ) अमृताच्या तुडुंब डोहांत डुंबणारी तुझी ती इंद्रपुरी आणि अप्सरांच्या उडत्या पदराचा वारा खात वरच्यावर तरंगणारे तुझे ते प्रणयी कवि, यांचा पृथ्वीला नांवापुरताहि उपयोग होणार नाही. दुःखाच्या खाईचं खरंखुरं चित्र रेखाटायला ती आग पिऊन जगलेला जीव हवा ! पृथ्वीतलावर अजून कवि आणि काव्य यांचा जन्म व्हायचा आहे. तथापि अवतारलेखनाचं कार्य करू शकतील अशा प्रतिभासंपन्न माणसांची पृथ्वीला उणीव आहे, अशां-तलाहि भाग नाही. तिला स्वर्गाच्या तोंडाकडं पहात बसावं लागणार नाही असं मला वाटतं.

इंद्र—असं असतांना तुम्हांला इतकी हुरहुर कां वाटते, हें एक मोठं कोडंच आहे.

नारद—प्रभूंची अट अशी आहे कीं, या भावी रामावताराचं चरित्र एकाद्या सत्पुरुषाकडून लिहून न घेतां, मुळांत पतित अन् पापी असलेल्या माण-साला आधीं शुद्ध करून नंतर त्याच्या करवीं तें करवून घ्यावं—

इंद्र—सरळ वाट सोडून मुद्दाम वाकडया वाटेनं जाण्याचं कारण ?

नारद—सज्जन स्वतांचा उद्धार करून घेतील यांत आश्चर्य नाही. अना-थांचा आणि अवनतांचा उद्धार होणं, ही गोष्ट तितकीच महत्वाची पण विकट अशी आहे. परमेश्वर हा पतित पावन आहे. तेव्हां पतिताला पावन करून त्याच्या मुखानं भगवंताचं नवं स्वरूप जगाच्या कानीं घालण्यांत स्वार्थ आहे आणि परमार्थहि आहे. ईश्वर हा चराचरांचा पालनकर्ता आहे. तथापि त्यांतल्या त्यांत तो पददलितांचा आणि रंजल्या गांजल्या जीवांचा खरा कैवारी आहे, हें सत्य, या कृतीनं सिद्ध होणार नाही कां ? पण असा माणूस मला सापडणार कुठं अन् तो पहिला कवि कसा होणार !

इंद्र—( विचार केल्यासारखें दाखवीत ) तुमच्या म्हणण्याचा अर्थ आतां मला कळून चुकला. याला एक उपाय मी सुचवितो, पहा पसंत पडतो का! आपण दोघे मिळून मानवांच्या जगांत जाऊं आणि त्या दृष्टीनं प्रयत्न करूं. परमेश्वरी कार्याला थोडाफार हातभार लावल्याचं श्रेय मला मिळेल.

नारद—( कांहीशा तुच्छतेनें ) हा, तेवढं साहस मात्र करूं नकोस! तुझ्याबरोबर माझ्या सारख्यानं असणं म्हणजे शालजोडीला ठिगळ लावल्याप्रमाणं होईल. म्हणून म्हणतो कीं, तूं आपला तुझ्या ऐसपैस स्वर्गांत असलेलाच बरा. आकाशाच्या कोंदणांत लुकलुकणाऱ्या दिखाऊ हिऱ्यानं आपली जागा सोडून खालीं येण्याचा हेका धरूं नये. न जाणो, कदाचित् त्याचा एकदम दगड बनून पृथ्वीच्या कपाळीं तो कायमचा आदळायचा! माझ्या जुन्यापुराण्या झोळीला हें स्वर्गींचं जडजवाहीर कसं झेपेल? नंदनवनांतल्या गोंडस गुलाबाला जगांतली उष्ण हवा सोसणार नाही. मी पडलों—'बारा पिंपळावरचा मुंजा!' कुठंहि जाईन अन् कांहीहि करीन. त्यांत मला कोणी हसणार नाही. पण तुझी गोष्ट तशी नाही. आपलं काम आपण करावं हें ठीक. शिवाय परमेश्वर आपली इच्छा कशी पूर्ण करून घेतो. हें कुणाला कळायचं नाही. त्याचीच प्रेरणा मला या समयीं योग्य दिशा दाखवील. तुझ्या सहानुभूतीचा मी फार आभारी आहे. बोलण्याच्या भरांत वेळेचं भान राहिलं नाही. बरं तर, येतों मी आतां. ( भजन करीत जातो. )

इंद्र—पण या प्रकरणाचं काय होतंय, तें मात्र मला सांगायला विसरूं नका हं! ( जातो. )

---

# प्रवेश दुसरा

( स्थळ—अयोध्येच्या वेशीजवळची निवांत जागा. निळू चाहूल घेत प्रवेश करतो. )

निळू—इथं असं उभं राहून माझे पाय जड झाले. सभोंवार वेडयागत बघून माझे डोळेहि भरून आले. पण इचा अजून ठिकाण नाही. सारीं कामं सोडून तिची भेट घेण्यासाठीं मी या ठिकाणीं जिवाची वावडी करून यावं आणि मी नेमका येणार हें तिला माहीत असूनहि तिनं माझ्यापासून फटकून दूर रहावं ! या प्रीतीच्या नादानं माणूस कसा नि कुठं वहात जाईल हें सांगतां यायचं नाही. फार लांब कशाला ! आतां माझीच गोष्ट पहाना ! वाल्या कोळ्याच्या तालमींत मी एक मुरलेला गडी. आजपर्यंत कितीकांना मी हातोहात फसवलं, पण या नखरेल पोरीनं बघतां बघतां मलाच चकवलं. आमच्या वाल्याची शिस्त फार कडक आहे. हा माझा नवा छंद जर कां त्याला कळला, तर हां हां म्हणतां माझी चटणी उडेल ! प्रीतीच्या तारा छेडून त्या तुटण्याच्या बेतांत आल्या, तरी ही गहिरी तारा उगवायचं चिन्ह दिसत नाही. ( थोडा वेळ थांबून ) असं तर झालं नसेल ! मी आपला तिच्या चरणांचा ताल धरून इथं असाच लोंबकळत पडायचा अन् ती चटक चांदणी कुणाच्या तरी नजरेंत भरायची. खरोखर, केवढा वेडा आहे मी ! तिचा नाजुक हात माझ्या गळ्यांत पडावा म्हणून बगळ्यासारखी मान उंच करून कावळ्याच्या डोळ्यानं तिला मी टेहळीत आहे. पण एकादा गुप्त यमदूत अचानक दत्त होऊन आपला काटेरी हात माझ्या गळीं टाकायचा. छे, हें उपयोगी नाही. ( कुणाची तरी चाहूल लागते. तो दचकतो ) समोरून तें कोण इकडंच येतंय ? काळू तर नसेल ! या वेळीं इथं हा अचूक कसा आला—या तारेवर त्याचाहि डोळा आहे कीं काय ? त्याच्या दृष्टीस आपण इतक्यांत पडूं नये. अहो, 'फट् म्हणतां ब्रह्महत्या' व्हायची. ( हात जोडून ) देवा, दया कर अन् त्या तारेला आतांच इथं येण्याची

दुर्बुद्धि देऊं नको. या झाडा आड लपून राहून पहावं. ( लपून राहतो. त्याचा मित्र काळू येतो. )

काळू—सकाळपासून हा निळू गेलाय तरी कुठं ? त्या गुहेपाशीं मी त्याला ओझरता पाहिला. तेवढ्यांत माझा डोळा चुकवून तेथून तो निसटला. त्याचा माग काढीत इथवर मी आलों. अलिकडं तो कसल्यातरी फंदांत पडल्याचा मला दाट संशय येतो फुकट दुसऱ्याच्या कामांत आपण लक्ष कशाला घाला ! तो कांही का करीना, मला काय त्याचं ? आपलं काम आपण करावं म्हणजे झालं. ( जाऊं लागतो. )

निळू—( हलकेंच पुढें येत ) तारा दिसेल म्हणून मी आतुर झालों तर हा धूमकेतू मधेंच उपटला. माणूस करायला जातो एक अन् होतं भलतंच. ती आतां इथं आली तर साराच घोटाळा उडणार. काय करावं या फुटक्या नशिबाला ! वेळ तर निभावून नेली पाहिजे. त्याशिवाय घडगत लागायची नाही. मला वाटलं ही पीडा जाईल, पण हा पुन्हा मागंच वळला. तर आतां असंच करावं. ( काळू परत येतो. ) ए, काळू ! मला शोधायला तूं आलास अन् मला न बघतांच परत निघालास ? बारीक नजरेनं इकडं तिकडं कायरे पहातोस ?

काळू—मघांपासून मी तुलाच पहातोय.

निळू—मी तर तुझ्यासमोरच उभा आहे.

काळू—मग इतका वेळ तूं मला कसा दिसला नाहीस ? कुठं लपून बसला होतास काय ?

निळू—उजेड असो अथवा अंधार असो, आमच्या सारख्यांना लपून राहणं अन् जपून चालणं भाग पडतं.

काळू—पण मला बघून तूं लपून राहिलास याचं फार आश्चर्य वाटतं. तुझा हा लपंडाव जरा निराळाच दिसतोय. हा डाव दिवसाउजेडीं गांवालगत खेळण्यांत एकादे वेळीं अलगत गळा गुंतेल ! या लपंडावांतला तुझा तो खेळ-

गडी कुठं दिसत नाही ? मला पाहून तूं त्याला लपवून तर ठेवला नाहीस ना ! तुझा कांही नेम नाही म्हणून विचारतो. ( आसपास सूक्ष्म दृष्टीनें पाहतो. )

निळू—( त्याचा खांदा हलवीत ) हें बघ गड्या ! तसला लपवा-छपवीचा प्रकार इथं बिलकूल नाही. मी आधीं तसा लपून राहिलों नाही आणि कुणालाहि लपवून ठेवलं नाही. तूंच माझा खरा खेळगडी आहेस !

काळू—मग मला झुकांडी देऊन तूं इकडं गुपचुप कसा झुकलास ? तूं जरी तें माझ्यापासून चोरून ठेवलंस तरी तुझा एकंदर रागरंग माझ्या ध्यानीं आला आहे. चोराचीं पावलं चोरालाच कळतात !

निळू—संशयाच्या पिशाच्चानं तुला पछाडलंय. आंत एक अन् बाहेर एक असं मी निदान माझ्या मित्राशीं तरी कधीं करणार नाही.

काळू—होय ना ! मग सांग तर पाहूं ! मला चुकवून तूं या आडजागीं कां आलास अन् काय करीत होतास ?

निळू—काल संध्याकाळीं मी आपला सहज फिरत फिरत या बाजूला आलों. एक छानसं सावज मी हेरून ठेवलंय. अगदी बावनकशी सोन्याचा खजिना आहे. तें जर आपल्या जाळ्यांत सापडलं तर आपली अगदी चंगळ उडेल. त्याला कसं पकडायचं तें मी ठरवून सुद्धां ठेवलंय. पण तुला पहातांच तें बावरेल आणि चटकन उडून जाईल.

काळू—मला हें खरं वाटत नाही. तूं मला बनवूं पहात आहेस. अरे, ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी ! तुझं हें सावज नेहमीपेक्षां खास निराळ्या रंगाचं असावं. पण म्हटलं जपून ऐस ! मोकळं रान सापडलं म्हणून शिकाऱ्यानं वाटेल तसे बाण मारूं नयेत. चुकून एखाद्या चंचल हरिणीच्या गहिऱ्या नजरेनं घायाळ होऊन खालीं पडण्याचा कठिण प्रसंग यायचा. असले उद्योग करायला केव्हापासून शिकलास ?

निळू—जें काय बोलायचं असेल तें एकदा बोलून घे. तूं माझ्याहून वडील आहेस. अन् एका अर्थानं या धंद्यांतला गुरुहि आहेस. नमस्कार गुरुमहाराज !

काळू—( हसत ) असल्या दिवट्या चेल्याशीं गांठ पडल्यावर गुरुला आपलं चंबूगवाळं गुंडाळून पळून जावं लागेल.

निळू—( आंबट चेहरा करून ) मी तुला खरं तें सांगितलं तर तें तुला खोटं वाटतं. आहे कीं नाही जगाचा उलटा न्याय ! माझा कारभार अगदी सरळ असतो. दुसऱ्याच्या पायांत आपला पाय घालून त्याला खाली पाडण्याच्या कामांत तुझा हात धरणारा कोणी नाही. माझ्या पाठीला असा हात धुवून कां लागला आहेस ? खरं सांगूं तुला, नाइलाजानं मी या आडवाटेला लागलों.

काळू—तें काय विचारावं ! हे तुझे चोरटे चाळे माझ्यापुढं चालणार नाहींत. बरेच दिवस मी पहातो आहे, तुझं लक्षण मला कांही ठीक दिसत नाही. भलत्या भानगडींत पडून तूं आपला गळा गुंतवून घेशील अन् आमच्या गळ्या-वर पाय देशील, अशी मला भींति वाटते. अलीकडं पहिल्याप्रमाणं खुल्या दिलानं तूं माझ्याशीं वागत नाहीस, हें बरं नव्हे ! वेळींच ताळ्यावर ये, नाही तर तुझ्यांत झालेला हा घातुक बदल मला वाल्याला कळवावा लागेल. मग तुझे हाल कुत्रादेखील खाणार नाही !

निळू—तुझ्याबद्दल माझ्या मनांत पूर्वीं इतकाच आपलेपणा आहे. तसं पहिलं तर माझ्यांत कांही बदल झाला नसून तुझंच मन पालटलंय. मी तर असं चक्क म्हणतो कीं, मला हुडकण्याचं निमित्त मात्र तूं पुढं करीत आहेस. तूंहि कसल्यातरी नाजुक नादांत अडकला आहेस, हें तुझ्या मुद्रेवरून दिसून येतंय. मी तुला पुरतेपणीं ओळखतो. माझ्यावर उगाच आळ घेऊन तूं आपली लबाडी लपवूं पहातोस. ‘ कर नाही त्याला डर कसली ’?

काळू—( आर्जवी स्वराने ) निळोबा; असा बिथरून जाऊं नकोस ! अरे, मी आपलं चेष्टेनं बोललों इतकंच. तूं तें मनावर घेण्याचं कारण नाही. पण काय रे ! असा कावरा बावरा होऊन तूं इकडं तिकडं काय बघतोस ? ( हसत ) तुला भेटायला कुणी येणार आहे का ! माझी अडचण होत असेल तर मी आपला निघून जातो. एकाच पिसाऱ्याचीं आपण पाखरं आहोंत.

निळू—( कंटाळून ) माझ्या राशीला तूं असा कां लागला आहेस ? तुझ्या पिसाऱ्यांत तूं मला बळेंच गुरफटून टाकूं नकोस. तुला एकदा सांगितलं ना ! मला भेटायला कुणी येणार नाही आणि मीहि कुणाला भेटणार नाही.

काळू—तूं कांहीहि म्हण, पण तुझं चित्त आज ठिकाणावर दिसत नाही. माझ्यापासून तूं नक्की कांही तरी लपवून ठेवीत आहेस. या तरुण वयांत माण-साला असं होतं कधी कधी. पण आपलं बीळ सोडून उंदरानं असं उघड्यावर वावरूं नये. अेकादा बोका पट्दिशीं झडप घालायचा !

निळू—( चिडून ) ए, काळ्या ! तुला आज झालंय तरी काय ? आं, तूं चालवलं आहेस तरी काय ? तुझ्या आडव्या तिडव्या बोलण्यानं माझे कान किटून गेले. ( कानावर हात ठेवतो. )

काळू—मला कांही झालं नसून तुला मात्र कांही तरी होत आहे हें अगदी खास ! तूं होय म्हण किंवा नाही म्हण. पण तुझी ही अंतराळी अवस्था पाहून मला तुझ्याविषयीं थोडं निराळं वाटू लागलंय. चेहरा हा मनाचा आरसा आहे !

निळू—तुझ्या मनांतली मळमळ एकदाची ओकून टाकून मोकळा हो वघूं कसा ! मला पटलं तर मी होय म्हणेन.

काळू—( स्वर बदलून ) काय रे निळू, तूं कुणाच्या प्रेमाबिमांत पडला आहेस कां ?

निळू—( हसून ) कांही तरी बोलतोस झालं. माझ्यावर रे कोण प्रेम करणार !

काळू—तें मी कसं सांगूं ! तुझं गुपीत तुलाच ठाऊक. आपल्यावर कुणाचं तरी प्रेम असावं किंवा आपलं कुणावर तरी प्रेम असावं, असं तुला नाही वाटत ?

निळू—मला पुष्कळ वाटतं. पण अशी संधी माझ्यासारख्या दरवेशाला कशी मिळणार ! तुझं कधी कुणावर प्रेम बसलं होतं कां रे ?

काळू—बाबा, तें असं सांगून समजत नसतं. ज्याचं कोडं त्यानंच सोड-वावं. त्यांत दुसऱ्याचा हात शिरकला कीं गुंता झालाच म्हणून समजावं. प्रेमाच्या पाणपोईवर तिऱ्हाइताच्या हातानं पाणी पिऊन तहान भागत नाही !

निळू—हें बघ काळू, ज्यासाठी माणूस आपला जीव गहाण टाकायला तयार होतो, असं एवढं त्या प्रेमांत असतं तरी काय रे ?

काळू—तूं अजून बच्चा आहेस. प्रेमांत काय असतं म्हणून तूं विचारतोस ! अरे, त्या प्रेमांत अवघं ब्रह्मांड साठविलेलं असतं. प्रेम ! किती गोड शब्द आहे हा ! उसळणाऱ्या तारुण्याला मुसमुसणारी प्रीति आनंदाची भरती आणते. तिच्या त्या गोड पुंगीनं गुंगी न येणारा प्राणी, खरा हतभागी होय ! मिळालं तर प्रेम हें अमृत आहे, नाहीतर त्याच्या सारखं प्राण घेणारं विष जगांत दुसरं नाही. या प्रेमामुळं मोठमोठे मुनी आणि देवहि वेडे झाले. आपण तर सामान्य माणसं आहोंत.

निळू—( त्रासिक मुद्रेनं ) काळोबा, ही जंगली रहाणी मला नकोशीं झाली आहे. साध्या माणसाप्रमाणं या पुढं आपलं आयुष्य कंठण्याचा मी विचार केला आहे. तुला तें आवडो वा न आवडो !

काळू—शेवटीं झुडुपांत लपलेला ससा बाहेर पडला म्हणायचा.

निळू—प्रत्येक गोष्टीची तुला आपली थट्टाच वाटते.

काळू—तसं नव्हे रे निळू ! खरं म्हणशील तर माझा देखील विचार तसाच आहे. या वाल्याच्या मागं लागून जन्माचं दिवाळं निघायची पाळी आली. आपण आहों म्हणून त्याला कांही कमी पडत नाही. पण आमची किंमत त्याला आहे कां ? हा जुलमाचा रामराम आतां पुरे झाला. अेकादा चांगला जोडीदार पाहून स्वतंत्र संसार थाटण्याचं माझ्या मनांत राहून राहून येतं. पण हें जमणार कसं अन् कधी !

निळू—प्रेमाशिवाय जगण्यांत राम नाही असं माझं तर ठाम मत आहे.

काळू--तुझ्या मनाची इतकी तयारी झाली आहे तर? तरीच मला वाटलं तें खोटं ठरलं नाही.

निळू--तूं आहेस तसा मनकवडा. आपला हा बेत त्या आग्या वेताळाच्या कानीं जातां कामा नये. तसं झालं तर आपलीं शंभर वर्षं भरलींच म्हणून समज. दगडाखालीं सापडलेला हात मोठ्या युक्तीनं काढून घ्यावा लागतो.

काळू--पण या ठिकाणीं तूं असा ताटकळत किती वेळ उभा राहणार? प्रीतीच्या प्रांतांत फार सावधगिरीनं पाऊल टाकावं लागतं. हा रोग माणसाला एकदा जडला कीं, त्याला कशाचंहि भान उरत नाही. तीच कठिण अवस्था सध्या तुझी झाली आहे.

निळू—[ उपहासानें ] ज्या रंगाची काच डोळ्यांसमोर धरावी त्याच रंगाचं सभोवारचं जग पहाणाऱ्याला दिसतं. तुझ्या प्रेमाची बाधा तूं माझ्या अंगाशीं आणीत आहेस. ‘ खाई त्याला खवखवे ’ दुसरं काय ?

काळू—एका अगदी जरूरीच्या कामासाठीं मला परत फिरलं पाहिजे. अरे, आकाशाकडं डोळे लावून का कुठं चंचल तारा प्रसन्न होत असते ! [ निळू चपापतो ] हा वेडेपणा सोडून दे. चल ! [ त्याचा हात धरतो. ]

निळू—( काळूचा हात झिडकारून ) तुझ्या बरोबर मी आलों असतो, पण त्याचं असं झालयं कीं, ही जागा सोडून मला जातां येत नाही. खरंच काळू, वाल्यानं एक जोखमीची कामगिरी मला दिली आहे. ती पार पाडल्या-शिवाय मला इथून कसं बरं हलतां येईल ?

काळू—तुझ्या डोक्यांत हें नसतं खूळ शिरलंय. पण निळू, हा विस्त-वाशीं खेळ आहे हं !

निळू—ऊं, मला माहित आहे तें. दुसऱ्याला खुळा म्हणणारा शहाणा हा कित्येक वेळा स्वतांच खुळा होत असतो. तुझ्याशीं बोलण्याची सोय नाही. तुला सांगायला गेलों तर तूं मला टांगायला आलास. चालूं दे तुझं एरंडाचं गुऱ्हाळ. ( पाठ फिरवून निघून जातो. )

काळू—( त्याच्याकडे पहात ) हा तर मला न पुसतांच वाट चालूं लागला. या निळ्याला मी नाकासमोर जाणारा प्राणी समजत होतो. पण हा नाकावर माशी देखील बसूं देत नाही. कांही काम नसतां हा एवढा वेळ इथं घुटमळत राहिला होता, त्या अर्थी यांत कांहीतरी गोम असावी. खरंच, तसं जर असेल तर तो आपसूख परत येईल. प्रेमांत पडलेलं माणूस म्हणजे दुधाला चटावलेलं मांजर ! आपण त्याच्यावर यापुढं पाळत ठेवावी. म्हातारीनं कोंबडं झाकलं म्हणून उजाडायचं थोडंच राहतं ! ( जातो. )

---

## प्रवेश तिसरा

( स्थळ—अरण्य, नारद भजन करीत येतो. )

(२)

नारद—**करुणामय नारायण**
**मंगल गा ! नाम मना ॥ धृ० ॥**
**प्रभुराया प्रिय झाला**
**आवडिनें आळविला**
**वारुनिया झणिं माया**
**दिव्य निधी दे स्वजना ॥ १ ॥**

( सभोंवती पहात ) अहाहा ! हरिनामाची माधुरी कांही निराळीच आहे. हें स्थान तर किती रम्य आणि प्रशांत आहे ! सहज मनोहर वैभवानं नटलेल्या या निसर्गराजाच्या राज्यांत परमेश्वराचं सुरम्य स्वरूप अनेक प्रकारांनीं आणि आकारांनीं खेळत असल्याचा मनाला भास होतो. मंजुळ वायूची वीणा वनवून ही सुंदर वनराणी ठिकठिकाणीं आपल्या गोड गळ्यानं त्या विश्वव्यापी प्रभूचं गुणगायन करीत विहरत आहे. नव्या पानाफुलांनीं बहरलेली ही

वृक्षराजी, त्याच दिव्य आनंदाच्या नादांत रंगून डोलत आहे. रुप्याच्या ओघळा —प्रमाणं कडेकपारींतून पाझरणारे हे चिमणे झरे—हिरवळीवर स्वैरपणानं बागड-णारीं हीं गोजिरवाणीं हरणं—सभोंवार नव्या नवलानं गोड किलबिल करीत खेळणारीं हीं रंगीबेरंगीं रानपाखरं आणि मोहक सृष्टिसुंदरीचा रंगलेला हा सारा आनंदी संसार माझ्या मनाला कसा मोहून टाकीत आहे ! ( एकदम आठवण झाल्यासारखें दर्शवून ) अरे हो, या अपूर्व आनंदाच्या भरांत एक गोष्ट मी अजिबात विसरून गेलों होतो. बरी आठवण झाली. पण मला हवा असणारा माणूस या आडरानांत कसा सापडणार ! याच ठिकाणीं मला नकळत घेऊन येण्यांत नियतीचा कांहीं विशिष्ट हेतु तर नसेल ! हो, तसंच असलं पाहिजे. त्याखेरीज गांवांत न शिरतां या रानांत येण्याची बुद्धि मला झाली असती कां ? ( भजन करूं लागतो. वाल्या कोळी खांद्यावर फरशी कुऱ्हाड टाकून प्रवेश करतो. )

वाल्या—( स्वगत ) आजचा दिवस जरा वेगळा दिसतो. ( उघड ) ए, गोसावड्या ! कुठं निघालास ? एकदम उभा रहा.

नारद—( भ्याल्यासारखें करून ) कोण ? लुटारू ?

वाल्या—मी नव्हे. तूंच खरा लुटारू—पक्का गळेकापू आहेस. बघतोस काय असा ?

नारद—तें कसं काय बुवा !

वाल्या—( पुढें पाऊल टाकून ) तूं कसा आहेस हें तुझा हा वेषच सांगतो आहे. वरून संभावित आणि आंतून सोदा ! या तुझ्या भगव्या छाटीला किती अमंगळ पुढं चढलीं असतील तें एक तुलाच माहीत. मेंढराचं कातडं पांघरलं म्हणून लांडग्याचं अंतरंग झाकत नसतं.

नारद—खासा न्याय ! अरे, तूंच स्वतां खाटीक बनून गरीब वासरांच्या माना छाटतोस, आणि या सोवळ्या बाल ब्रह्मचाऱ्याला लांडगा म्हणतोस. काय, म्हणावं काय तुला ?

वाल्या—( हेटाळणीच्या स्वरांत ) असले नकली साधु मी पुष्कळ पाहिले आहेत. वाण बदलला म्हणून गुण कांही लपत नाही. तसं असतं तर सगळेच कावळे राजहंस झाले असते. लग्नाचा पाश गळ्यांत अडकवून न घेतां प्रेमाची रासक्रीडा करायला हें रंगित सोंग एक उत्तम साधन आहे. तुझा हा बिनभांडवली धंदा चांगला चालत असेल नाही ?

नारद—नारायण, नारायण ! भल्या माणसा, माझ्यावरचा तुझा हा आरोप अगदी अनाठायीं आहे. स्वप्नांत सुद्धा मी कधी कुणाचं वाईट चिंतलं नाही. स्वतां हरिनामाचा गजर करावा आणि दुसऱ्यांना भगवंताचा महिमा वर्णन करून सांगावा, हें माझं पवित्र कार्य. केवळ त्यासाठीं मी असा बुवा होऊन जगभर फिरत असतो.

वाल्या—( उपहासपूर्वक ) आपल्या सारख्या संतांचं दर्शन म्हणजे एक अपूर्व पर्वणीच. आपला बेत फार नामी आहे बुवा ! तुमच्या या रेशमी जाळ्यांत आतापर्यंत बरींच नाजूक फुलपाखरं सापडलीं असतील ? पण काय हो ! गांवची सरळ वाट सोडून अशा आडवळणानं या जंगलांत कां शिरलांत ? का एकादी अल्लड वनबाला तुमच्या भजनीं लागली आहे ? तुमच्या सारख्या तरुण ब्रह्मचाऱ्यांचा अन् रंगेलरावांचा कांही नेम नाही म्हणून विचारतो. जाल तिथं मजा कराल ! पण म्हटलं सांभाळून असा. या वाल्या कोळ्याशीं गांठ आहे. एक घाव कीं दोन तुकडे !

नारद—( शांतपणानें ) मायेचा पाश नसलेल्या आम्हां मुशाफिरांना गांव आणि रान दोन्हीहि सारखंच. माणसाच्या जन्माला येऊन असा एकाद्या जंगली जनावराप्रमाणं वागूं नकोस. अजून वेळ गेली नाही. नीट शुद्धीवर ये आणि आपल्या हिताचा मार्ग धर !

वाल्या—तुझा वेदांत जरा बाजूला राहूं दे. तशीच निकड लागली तर सवड काढून तुझ्याकडं धाव घेईन. ( आवाज चढवून ) मी सांगतो तसं आधी कर ! तुझ्याजवळ काय असेल नसेल तें काढून ठेव. असा बेरडागत काय

बघतोस ? तंबोऱ्याची खुंटी पिळल्याशिवाय सूर लागायचा नाही. ( कुऱ्हाड उगारून ) हां, आटप लवकर !

नारद—( मागें सरकत ) अरे, जरा ऐकशील की नाही. का आपलं ' ऊठ सोट्या कूट '! असा माजलेल्या रानरेड्याप्रमाणं शिंगं रोखून माझ्या अंगावर चाल करून येऊं नको. हें बघ, माझ्यापाशीं पैसा अडका— कांही म्हटल्या कांही नाही ! मी आपला एक साधा गोसावी. मला गरीबाला उगाच कां छळतोस ?

वाल्या—गोसावडा अन् गरीब—साफ खोटं ! नाग आहे आणि म्हणे फडा काढीत नाही—असं कधी झालंय कां ? हातांतल्या राखुंडीची चिमूट भोळ्या बायाबापड्यांचा डोळ्यांत फुंकून, त्यांचं डबोलं बघतां बघतां काखेंत मारून पसार होणारे असले कैक लफंगे मी लंबे केले आहेत.

नारद—हा तुझा निवळ भ्रम आहे. मला अडविण्यांत तुला तसलं कांही मिळणार नाही, आणि याचंच मला, तुझ्याकडं बघून फार वाईट वाटतंय. तुला वाटतोय तसला मी मुळीच नाही.

वाल्या—( जरा पुढें होऊन ) मग असा मुरकत मागं कां सरकतोस ? तुम्हां काळोखांतल्या काळभैरवांपेक्षां आम्ही उजेडांतले वाटमारे फार बरे ! तुझ्या असल्या गुळचट बोलण्यानं मी बनायचा नाही. तूं दिसतोस तसा मुळीच नाहीस. वाहत्या पाण्यापेक्षां संथ पाण्यालाच शेवाळ अधिक बिलगतं !

नारद—मला घर ना दार ! माझ्या सारख्या भटक्या भिक्षेकऱ्यापाशीं असणार तें काय ? [ थोडी आठवण करून ] हो, पण थांब ! एक अमोल ठेवा माझ्याकडे आहे. तो जर तूं आपलासा केलास तर तुझ्या उभ्या जन्माची ददात कायमची मिटेल.

वाल्या—[ मिष्किलपणानं हसत ] वा, छान ! मग घोडं अडलयं कुठं ? आपला माल आपखुशीनं आमच्या हवालीं करणारं गिऱ्हाईक भेटलं तर त्याचा भार हलका होईल आणि आमचीहि दगदग वाचेल. इकडं आण तुझी

ती बहुमोल ठेव. मी नीट जपून ठेवीन हं ! तूं त्याची मुळीच काळजी करूं नको. हं, आण बघूं इकडे !

नारद—[ गंभीरपणानें ] तो ठेवा असा डोळ्यांत भरणार नाही कीं हातीं मावणार नाही. मनची खूण मनांतच ठेवावी लागेल. माझ्याकडे स्थिर दृष्टीनं बघ आणि सावधान चित्तानं श्रवण कर, अन् मुखानं मी सांगतो तसं सारखं म्हणत रहा ! ज्यापुढं अवध्या दुनियेची दौलत फिकी पडेल, असं तें मधुर अन् मंगल रामनाम आपल्या हृदयांत कोरून ठेव—

(३)

**नामसुधा सुखदा, जिवा ही**
**सेवित जा तूं सदा ॥ ध्रु० ॥**
**नवनामाचा मंगल महिमा**
**रूपगुणांही नाही सीमा**
**त्या प्रेमाला नलगे उपमा**
**दूर करी आपदा ॥ १ ॥**
**येइल उदया राम जगीं या**
**सावध हो, यश त्याचें गाया**
**शांति निरंतर वितरी हृदया**
**सुंदर ती संपदा ॥ २ ॥**

वाल्या—[ दरडावणीच्या स्वरांत ] अरे चोरा ! मला गुंगत ठेवून दडी मारायचा विचार आहे वाटतं तुझा ? बच्चाजी, तुझ्या गमजा माझ्यापुढं चालायच्या नाहीत. [ झटकन् पुढें होऊन त्याची मान पकडतो. ]

नारद—[ काकुळतीनें ] अरे, जरा दमानं घे रे ! मला बोलायला थोडी सवड देशील कीं नाही. माणूस आहेस कीं कोण आहेस ? तुझं बरं करावं म्हणून मी आलों तर तूं आपलंच खरं करूं लागलास. मी कांही कुठं पळून जात

नाही. कृपा कर अन् जरा दूर हो पाहूं आधीं। किती जोरानं माझा गळा दाबलास ! [वाल्या त्याची मान सोडून दूर होतो.] मला मारून तुला मिळणार तरी काय !

वाल्या—तुझ्याबरोबर फुगडी घालायला मी मोकळा नाही. [ आसपास नजर टाकून ] तुझी झोळी तिकडं लपवून ठेवलीस काय ? तरीच तूं सारखा मागं वळून पहात आहेस. त्या झोळींतला तो पिवळा गोळा तूं मुकाट माझ्या स्वाधीन कर ! त्या शिवाय मी तुला मोकळा सोडणार नाही.

नारद—परोपरीनं तुला सांगून पाहिलं पण 'पालथ्या घागरीवर पाणी' ! हा वीणा, ही माळ, या चिपळ्या अन् खडावा—हा माझा सारा सरंजाम तुला अर्पण करतो. [ त्या प्रमाणें करतो व कंबरेवर हात ठेवून त्याच्यापुढें उभा राहतो.

वाल्या—[ वैतागून ] या कवडी किंमतीच्या वस्तू घेऊन मी काय करूं ?

नारद—हो बावा अन् भजन करीत दारोदार फीर ! तोंड वर करून भीक मागणं हें खालीं बघून गळे दाबण्यापेक्षां खास वाईट नाही.

वाल्या—[ निराशेनें ] करायला गेलों एक अन् झालं तिसरंच. हें बिनमधाचं मोहळ हातीं लागलं.

नारद—दुःखाच्या मधमाशा तूं आपल्या भोंवती उगाच कां उठवीत आहेस ! इतका घोटाळ्यांत कां पडलास ? हा साज चढीव अन् चल माझ्या बरोबर ! ( त्याचा हात धरून ) हं, थांबलास कां ? उचल पाय–

वाल्या--( त्याचा हात दूर करून ) छे, तें मला मुळींच जमणार नाही. हा तुझा शिणगार तुलाच लाखलाभ होवो ! एकूण सगळी खटपट अंगलट आली म्हणायची. तें कांहीहि असो, तूं तर माझ्या हातीं सापडलास आहेस ना ! भुकाळू वाघ कसल्याहि सावजावर शेवटीं झडप घालतोच. ( डोळे वटारून ) हं,

घे तुझ्या देवाचं नांव. तुला असाच वरती रवाना करतो. ( त्याच्या डोक्यांत मारण्यासाठी कुऱ्हाड सरसावतो. )

नारद--( निर्भयपणानें ) सावध हो, पुन्हा ऐक- तूं अजून सावध हो! असा भलता अविचार करूं नकोस. दीन दुबळ्यांचे जीव घऊन तुझ्या जिवाला कधीही समाधान मिळणार नाही. विष पिऊन कोणी जगला आहे का ? मरायला मी तयार आहे. पण लक्षांत ठेव, हा अत्याचार अखेरीस तुझाच कपाळमोक्ष करील! कडूलिंबाच्या झाडाला गोड फळं कशी लागतील ? असा बघत काय राहिलास-उचल कुऱ्हाड अन् कर प्रहार! (वाल्या त्याचें अवसान पाहून वरमतो.)

वाल्या—साधूपणाचा कितीहि आव आणलास तरी तूं आज येथून जिवंत सुटत नाहीस. (मिशीला पीळ भरीत) हा नांवाचा वाल्या कोळी आहे! एकदा गळाला लागलेला मासा फिरून पाण्यांत जात नसतो.

नारद—[ संथपणानें ] एक प्रश्न मी तुला विचारतो. त्याचं मला आधी सरळ उत्तर दे अन् मग मला खुशाल ठार मार! त्याला माझी कांही अडकांठी नाही.

वाल्या—[ कुऱ्हाड खालीं करून ] काय तें झटदिशीं बोल! नाच्या-पोऱ्यागत उगीच नखरा करूं नकोस.

नारद—हिंसा करणं हें पाप आहे. या पापांत तुझ्या घरची मंडळी सामील असतीलच!

वाल्या--( अहंकारानें ) हो. यांत काय संशय ?

नारद--अरे बाबा, खरं पाणी तर इथंच मुरतंय. सुख वाटून घ्यायला सारे धावून येतात, पण दुःखाला वाटेकरी कोणीच असत नाही! दुःख आणि पाप ज्याचं त्यानंच वाहिलं पाहिजे. हातच्या कांकणाला आरसा कशाला! हवं असल्यास घरच्या माणसांना विचारून ये, म्हणजे तुझ्या डोळ्या-वरची धुंदी उतरेल.

२००१८३३

वाल्या—( बेपर्वाईनें ) ऊं, त्यांना काय विचारायचं त्यांत ? ताटाखालचीं मांजरं तीं ! जी माझी इच्छा तीच त्यांची असणार हें उघड आहे. त्यांच्या-साठीं मी रात्रंदिवस गुरासारखा राबत असतो. माझा शब्द झेलून धरायला त्यांना धावत यावं लागेल. तीं माझीं माणसं आहेत. माझं घर माझ्यावरच फिरेल असं तुला वाटलं तरी कसं ? का तुला आपलं एकांत दुसरंच दिसतं !

नारद—जसं दिसतं तसंच जर खरं असेल तर फार बरं होईल. पण बाबा, तसं तें नसतं म्हणून माणूस नेहमी फसतं आणि अखेरीस कपाळाला हात लावून बसतं. डोंगर दुरूनच साजरे दिसतात ! तुला नको असेल तर राहूं दे. माझा कांही आग्रह नाही. पण तुझंच त्यांत हित आहे. म्हणून पुन्हा म्हणतो कीं—

वाल्या—( त्रासून ) तुझं पुन्हा आपलं तेंच. हरिदासाची कथा मूळ पदा-वर ! माझ्या कामांत घरची मंडळी हवीत कशाला ? मी करीन ती पूर्व ! वारा वाहेल तसं गवत डुलत राहतं—

नारद—मित्रा ! माझं थोडं ऐकशील कां ? दुसऱ्याचं मत आपल्या तोंडानं सांगण्यांत कदाचित् आपलीच तोंडफोड व्हायची. या संसारांत कोणाची खात्री कोणी देऊं नये. झाडाकडं काणाडोळा करून त्याचीच सावली उन्हाच्या तालावर नाचूं लागते ! तुझ्या माणसांचा तुला अभिमान असणं स्वाभाविक आहे. पण चकाकणारा प्रत्येक पदार्थ सोन्याचा नसतो ! उसन्या मोठेपणांत तूं दंग आहेस. ' गर्वाचं घर खालीं असतं '- हें नीट लक्षांत घे.

वाल्या—( विचार करीत ) तुझं म्हणणं थोडसं खरं आहे.

नारद—वाकड्या वाटेवरून डोळे मिटून चालण्यांत केव्हा तोल जाऊन डोकं फुटेल, याचा नेम नसतो. ' माझीं माणसं-माझीं माणसं ' म्हणून मारे मिशीला पीळ भरीत तूं जोरानं गर्जत आहेस, पण तीं खरींच ' तुझीं माणसं ' आहेत कां, हें एकदा पाहून तर ये !

वाल्या—( नरमाईनें ) ब्रम्हचारी बुवा! तुम्हीं मला तर हें अवघड कोडंच घातलंत. त्याला मी 'नाही' म्हणत नाही. परंतु माझी पाठ फिरतांच तुम्ही मात्र पोबारा कराल-त्याची काय वाट?

नारद—त्याची तूं बिलकूल चिंता करूं नकोस. तुझी वाट पहात या समोरच्या माडाची नक्कल करीत या ठिकाणीं असा भजन करीत उभा राहीन. असाच तडक घरीं जा आणि नीट खुलासा करून सरळ माघारीं ये! ( डोळे मिटून भजन करतो. वाल्या त्याच्याकडे वळून पहात थबकत निघून जातो. )

अंक १ ला समाप्त

# अंक २ रा

## प्रवेश पहिला

(स्थळ—अयोध्येची वेस, तारेच्या भेटीसाठीं अधीर झालेला निळू येतो.)

निळू—(कानोसा घेऊन) मला वाटलं कीं हा काळ्या माझा पुरताच पिच्छा पुरवणार! माझ्या प्रीतीचा खेळ त्यानं ओळखला कीं काय? माझ्या मागचा त्याचा ससेमिरा चुकवितांना माझी अगदीं पुरेवाट झाली. अहो, करतां काय? हें काम मुळांत फार नाजूक, त्यांत तिसऱ्याच्या शिरकाव झाला कीं आपल्या डोक्यांत कुऱ्हाड पडलीच म्हणून खुशाल समजावं. (मागें पुढें न्याहळीत) ही माझ्या मागची व्याद एकदा टळली म्हणायची. आतां माझा जीव जरा भांडयांत पडला. ती चटक चांदणी एवढयांत मला भेटेल तर सोन्याहून पिवळं होईल. इतका भाग्यवान मी आहे का! (चाहूल घेतो. मुरकत तारा प्रवेश करते.) अगदी बोलाफुलाला गांठ पडली. (तिच्या जवळ जातो. ती लाजत मागें सरकते.) असं भ्यायला ग काय झालं?

तारा—(लडिवाळपणानें) मला किनई तुझी जरा भीति वाटते. थोडं लांब राहून माझ्याशीं बोललास तर चालणार नाही का!

निळू—(अधीर होऊन) हें बघ, आतां माझ्यानं लांब राहवत नाही. इतके दिवस लांबून खडे टाकून पाहिले पण तें कांही नीट जमत नाही. अग तुला हें कसं कळत नाही. गोड दुधाचा पेला ओठाशीं आला तरच त्याची खरी गोडी जिभेला कळणार! म्हणे लांब रहा. जवळ आल्याशिवाय असल्या गोड कामाला खरा रंग चढत नाही. तें कांही नाही. मी असा तुझ्याजवळ येणार अन् तुला माझ्या जवळ घेणार. (तिच्याजवळ जाऊन तिला धरूं पाहतो. ती बावरते.)

तारा—असला लघळपणा मला मुळीच आवडत नाही. आपली नीट ओळख होऊन पुरते दोन दिवसहि उलटले नाहीत, तोंच तूं माझ्याशी लगट करूं लागलास. भारीच अधीरा स्वभाव आहे तुझा !

निळू—अग, दोनच दिवस काय, अवघ्या दोन क्षणांतहि प्रेमाच्या बीजाला चांगलाच अंकुर फुटतो. त्या दिवशीं तिन्हीसांजेच्या सुमारास सर्वेश्वराच्या देवळाच्या आवारांत तुला मी सहज पाहिली, तेव्हापासून तुझ्याशिवाय दुसरं कांही मला सुचेनासं झालंय. देवाच्या पायां पडायला म्हणून गेलों आणि या देवीचं दर्शन घडलं. त्या एका क्षणाची जादू कांही और आहे.

तारा—( किंचित् लाजल्यासारखें करून ) देवीचं दर्शन घडलं पण ती प्रसन्न व्हायला भक्तानं काय करायचं ठरवलंय ?

निळू—हे माझे पंचप्राण मी तिच्या चरणीं अर्पण करीत आहे. ( तिच्या जवळ जाऊन तसा अभिनय करतो. ) तरी या प्रेमदेवतेनं आपल्या व्याकुळ भक्ताकडं प्रेमळ दृष्टीनं पहावं एवढंच एक मागणं आहे.

तारा—तुला माझा असा ध्यास लागण्याइतकी मी सुंदर कां आहे !

निळू—खरोखर, तूं मला फार सुंदर दिसतेस आणि आवडतेसहि ( ती लाजून बघते. ) असं लाजूं नकोस गडे ! तुझ्याकडं टक लावून सारखं पहात रहावंस वाटतं. लाडके, तुझ्या प्रेमानं माझं हृदय काठोकाठ भरून आलंय !

तारा—सुंदर स्त्री दिसली की पुरुषाला एकाएकीं प्रेमाचा पाझर फुटतो. पण पावसाळ्यांत तुडुंब भरून वाहणारा ओढा उन्हाळ्यांत पार आटून जातो. तुझं प्रेम माझ्या रूपावर आहे कीं—

निळू—( आनंदानें ) माझं प्रेम खरंच तुझ्यावर आहे. तुझ्या सुंदरपणानं त्याला बळकटी यायला जास्ती मदत झाली, हें मात्र खोटं नाही. दुधाची गोडी साखरेनं नाही का वाढत ! अगदी तसंच हें आहे. बाकी खरं म्हणशील तर, खरं प्रेम आंधळं असतं. इतर गोष्टींची तितकीशी जरूरी भासत नाही.

तारा—गोड शब्दांची साखर पेरून भोळ्या जिवाला झुलवत ठेवण्याची कला तुला चांगली साधली आहे. सुकुमार मंजरीला पाहून चपळ भ्रमर तिच्या भोंवती गुणगुणत राहतो आणि तीहि भोळेपणानं त्या नादांत डोलूं लागते. आपल्या हृदयाची ठेव त्या मनचोरानं लुटून नेल्यावर त्या बिचारीचे डोळे उघडतात.

निळू—हृदयाची चोरी करण्यांत तरुणापेक्षा तरुणीच जात्या अधिक तयार असते. एखादी लबाड गुलाब कलिका भुंग्याला आपल्या भोंवती गुंगत मात्र ठेवते. एखादा मधुबिंदू मिळेल या आशेनं तो अधिक व्याकुळ झालेला पहाण्यांत तिला मौज वाटतें.

तारा—हें तूं कशावरून म्हणतोस ?

निळू—तुझ्या बाबतींत मला जो अनुभव आला आहे त्यावरून मी असं म्हणतो. माझ्या मनाची होणारी तळमळ तुला अजून कशी कळत नाहीं ? तुला वाटणारी शंका पुढं आपोआप कमी होईल. मी तुला एकदा आपली म्हटल्यावर त्यांत असं घाबरण्यासारखं तुला काय वाटतं ?

तारा—एक गोष्ट मी तुला विचारते. अगदी खरं सांगशील ना !

निळू—तुझ्या नि माझ्या प्रेमाला साक्ष ठेवून अगदी खरं तेंच सांगेन !

तारा—( लाजून ) यापूर्वीं तूं कुणावर प्रेम केलं होतंस कां ?

निळू—( हसून ) तुला पाहिल्यानंतर मला प्रेमाची कल्पना आली आणि त्या भरांत माझा प्रेमळ जीव प्रथमच तुझ्यावर जडला. तो आतां तिथून मागं फिरणं कधीहि शक्य नाहीं ! बरं, तुझं माझ्यावरचं प्रेम हें पहिलंच आहे ना ?

तारा—( पदराशीं चाळा करीत ) पुरुषाप्रमाणं स्वताला काय वाटतं, हें धीटपणानं उघड करून सांगण्याचं स्त्रीला जमत नाही. माझ्यावर तुझा विश्वास आहे ना ! तुझ्याविषयीं एक गोड भावना माझ्या मनाला भारून टाकीत आहे. ( एक गोड मुरका मारते. निळू अधीर होऊन तिला आपल्या जवळ घेतो. )

निळू—या एका दिव्य क्षणांत सारा आनंद भरून राहिला आहे. अशी अबोल कां झालीस? काय वाटतंय तुला–सांग ना! अशी थरथरतेस कां? माझ्यापासून तुला मी आतां दूर जाऊं देणार नाही.

तारा—( लाडिकपणानें ) असं काय गडे ! कोणीतरी बघतील ना ! मला जाऊं द्या आतां. प्रेमाचा आरंभ असा घाईनं करणं बरं नव्हे. ( त्याच्यापासून दूर होते. )

निळू—( तिच्या जवळ जात ) पुन्हा भेटीचा लाभ कधी होणार ?

तारा—वरचेवर तूं इथं येऊं नकोस. आपल्या प्रीतीचा गाजावाजा इतक्यांतच होणं इष्ट नाही. जरा धीरानं घेण्यांत दोघांचं कल्याण आहे. मी जातें आतां.

निळू—तूं सांगशील तसं मी करीन, मग झालं ना! तुझ्या गोड सोबतीला माझा जीव भुकेलेला असतो. तेव्हा जातां जातां एक गोडसा—( ती हसून मान फिरवते. निळू पुढं होऊन तिला अडवितो. )

तारा—सोडा माझी वाट, सजणा
निळू—आळख ही खुणगांठ, सजणी ॥ धृ० ॥
तारा—फिराफिरुनी कां येतां मागें
मधुर मनाला हुरहुर लागे
निळू—फार दिसांनीं गांठ पडे ही
रसरंगाची उसळ लाट ॥ १ ॥
तारा—खुणाविशीं हळु पुन्हा कशाला
काळवेळहा नाही तुजला
निळु—रमवी मजला थाट तुझा हा
सांग किती ग ! पाहूं वाट ॥ २ ॥
तारा—बावरली ही भोळी बाला
पुरे सख्या हा लवाड चाळा
निळू—स्वप्न गुलाबी नयनीं फुलतां
हासत गगनीं गोड पहाट ॥ ३ ॥

( तारा मुरकत जाऊं लागते. निळू पुन्हा तिला धरतो तोंच काळू प्रवेश करतो. )

काळू—अरे चोरा, मला गुंगारा देऊन इथं गुंगत राहिलास काय ? ( निळू आणि तारा दोघेही दचकतात ) हीच तुझी महत्वाची कामगिरी वाटतं ! तुझ्या आचरटपणाची मजल बरीच दूर गेली. अरे, जनाची लाज नाही निदान मनाची तरी ठेव ! तुला काय वाटलं कीं मी आपला बोळ्यानं दूध पितो ?

निळू—( चिडून ) तूं दूध पी नाही तर ताक भुरक. माझा मी मुखत्यार आहे. माझ्या खासगी गोष्टीत तूं आपलं तोंड घालूं नकोस. मला तें मुळीच खपणार नाही. (तारेचा हात धरून ) तूं काय करतोस तें मला बघायचं आहे.

काळू—तूं काय केलंस तें मी पाहिलं. आतां मी काय करतो तें तूं पहा ! ( चटकन् तारेचा दुसरा हात पकडतो. )

निळू—काळ्या ! हिचा हात सोडून तूं मुकाट्यानं आधी दूर हो !

काळू—[ रागानें ] ए निळ्या, बऱ्या बोलानं तूंच इथून दूर व्हावंस हें चांगलं !

निळू—या गोष्टीचा परिणाम चांगला होणार नाही !

काळू—माझंहि तुला तेंच सांगणं आहे.

निळू—( चवताळून ) मला सांगणारा तूं रे टेकोजी कोण ? हिनं आप-खुषीनं दिलेला हात मी कधीच सोडणार नाही.

काळू—तिच्या गरीबपणाचा तूं फायदा घेत आहेस. खरं म्हटलं, तर तिचा हात धरण्याचा हक्क, तुझ्यापेक्षां मलाच जास्त पोचतो.

निळू—थांब, तुला चांगलाच हात दाखवतो. ( तारा दोघांच्या हातांना हिसडा देऊन दूर जाते. ते दोघे पुन्हा तिच्या भोंवती उभे राहतात. )

तारा—( रागावून ) तुम्हीं हें दोघांनीं मांडलंय तरी काय ?

काळू—तारे, तूं मुळीच भिऊं नको. तूं आपली माझ्याजवळ ये कशी! ( तारा त्याच्याकडे जाते. ) हा निळ्या मोठा लबाड आहे.

निळू—हा काळ्याच मोठा कळगोटा आहे. तारे, तूं त्या चोराचं कांही ऐकूं नकोस. तूं आपली माझ्याजवळ ये पाहूं! ( ती पुन्हा हसत त्याच्याकडं येते. ) मी शेजारीं उभा असल्यावर या काळ्याची भीड धरण्याचं तुला कारण नाही.

तारा—तुमची हमरी तुमरी चालली आहे तोंवर मी कांहीच बोलत नाही.

निळू—तारे, तूं या काळतोंडयाबरोबर बिलकूल बोलूं नको. त्याच्याकडं पुन्हा ढुंकून सुद्धा पाहूं नको. तूं माझ्याकडं पहा बरं एकदा.

काळू—निळ्या, तिला असं सांगण्याचा तुला अधिकार नाही.

निळू—ही तारा माझी आहे.

काळू—वेड लागलंय तुला. मी तिला कधीच वचन देऊन चुकलों आहे, तुला तें माहीत नाही. ही तारा तुझी नसून माझी आहे.

निळू—अगदीच हा आहेस झालं. तूं खूप वचनं देशील. पण तिनं तुला तसं वचन दिलं नसणारच. ( त्याला वेडावीत ) म्हणे ही तारा माझी आहे. तोंड आहे म्हणून बोलतोस झालं.

काळू—द्राक्षं बघितलीं कीं कोल्हयाच्या तोंडाला पाणी सुटतं—

निळू—पण त्यांचा धनी वेगळाच असतो. मी तुला पुन्हा बजावून ठेवतो. तुझ्या आधी या सुंदरीचा हात मी आपल्या हातीं घेतला आणि माझं प्रेम पहिल्यांदा तिच्यावर बसलं आहे, आमच्या प्रेमांत तुझी लुडबूड चालणार नाही!

काळू—जोपर्यंत तुझं आणि तिचं लग्न झालेलं नाही तोपर्यंत तिच्यावरचं तुझं हें लादलेलं प्रेम मला साफ कबूल नाही. तुझा हा पांचटपणा आतां जरा आवरता घे, तिचं खरं प्रेम तुझ्यावर नसून तें माझ्यावर जडलं आहे.

निळू—( तारेकडे वळून ) तारके ! मी तुला एकदा माझी म्हटली आहे ना ! तुझं खरं प्रेम माझ्यावर आहे, असं याला अगदी सरळ सांग अन् त्याचे दांत त्याच्याच घशांत घाल.

काळू—तारे ! मी तुला मनांतून माझी मानली आहे. तसं या निळ्याला एकदा निक्षून सांग म्हणजे त्याची दातखिळी बसेल. बोल, लवकर बोल ! तूं मला हवी आहेस.

निळू—तिच्यावर आपल्या खुषीची सक्ती तूं लादूं नकोस. ही तारा मला हवीशी वाटते. ( तारेला उद्देशून ) आम्हां दोघांपैकीं कुणावर तुझं प्रेम आहे ? आतां अशी लाजूं नकोस. हं, सांग काय तें लवकर !

तारा—( खट्याळपणानें पहात ) माझं प्रेम तुम्हां दोघांवर आहे. (हसते)

निळू—( निराश होऊन ) छे, हें प्रेम जरा विचित्र वाटतं. असा दोन्ही डगरीवर हात ठेवण्यांत अर्थ नाही. एका म्यानांत दोन तलवारी कशा राहतील ! तारे, तुझ्या मनांत आहे तरी काय ?

काळू—एक घास एकाच वेळीं दोन तोंडांत कसा जाणार ! अशानं हें कोडं सुटणार नाही. माझा तुला फिरून सवाल आहे. आम्हां दोघांतून तुला अधिक कोण आवडतो-मी कीं हा ?

तारा—( गंभीर मुद्रा करून ) प्रीतीला अशी जबरदस्ती खपत नसते. तुम्हीं दोघेहि आपलंच घोडं पुढं दामटीत आहां. माझ्या मनाचा तुम्हीं कांही विचार केला आहे कां ?

निळू—तुझं म्हणणं रास्त आहे. पुन्हा एकदा विचार करायला तुला सवड देतों.

काळू—आम्ही दोघे तुझ्या प्रीतीचे उमेदवार आहोंत.

तारा—(रागावून) माझ्या प्रेमाचा तुम्हीं बाजार मांडला आहे, हें मला अगदी पसंत नाही. प्रेम हा काय पोरखेळ आहे ?

निळू—नाही ! तरुण जीवांचा तो एक आवडता खेळ आहे. तारे, खरंच तूं रागावलीस ? ( काळूकडे वळून ) तूं इथं आला नसतास तर फार बरं झालं असतं बघ !

काळू--तुला तसं वाटणारच. अरे, झाडावरच्या फळाला कुठलाहि पक्षी चालतो ! तुझ्या मूर्खपणानं हें काम तूं बिघडवून टाकलंस. ( तारेकडे पहात ) हें प्रकरण लांबणीवर टाकूं नये असं माझं स्पष्ट मत आहे. समज, हें आज तुझं स्वयंवर आहे. आम्ही दोघे तुला माळ घालण्याला तयार आहोंत. अशी बिचकूं नकोस ! दोघांतून आपल्या पसंतीनं एकाची निवड करण्याची पूर्ण मुभा तुला दिली आहे. काय निळू ! या गोष्टीला तूं कबूल आहेस ना ?

निळू—कांही हरकत नाही. तसंच समक्ष झालेलं बरं ! मागाहून कुणी तक्रार करायची नाही.

काळू—तारे, आतां मागं घेऊं नकोस. एकेक क्षण लाखाचा आहे. तुझ्या मनाविरुद्ध आम्ही जाणार नाही.

तारा—( क्षणभर विचार करीत ) मी काय सांगतें तें तुम्ही दोघेहि नीट ऐका ! तुम्ही दोघांनी आपापले डोळे अगदी घट्ट मिटून माझ्यासमोर स्वस्थ उभं राहायचं. ( ते दोघे तसें करतात. ) डोळा वर करून मधेंच तुम्ही बघायचं नाही. ( ते मानेनें आपली संमती देतात ) तुमच्या पैकीं ज्याच्यावर माझी मर्जी बसली असेल त्याचा हात धरून मी त्याला घेऊन जाईन. दुसऱ्यानं कांही कुरकूर न करतां दुसऱ्या मार्गानं निमूट निघून जायचं. ( काळू व निळू एकदा तिच्याकडे व नंतर परस्परांकडे रोखून पाहतात ). हं ! बोला लवकर, ही अट तुम्हांला कबूल आहे ? नसेल तर मी आपली जाते कशी ! मग बसा खुशाल गोंधळ घालीत. ( गेल्यासारखें करतें. )

काळू, निळू—तुझी अट आम्हांला एकदम मान्य आहे. तुझ्या इच्छेप्रमाणं होऊं दे. आतां वेळ लावूं नकोस. ( डोळे गच्च मिटून व कांही हालचाल न करतां दोघे उभे राहतात. तारा गालांतल्या गालांत हसते. )

तारा—थोडं सुद्धा हलूं नका कीं बघूं नका! तुमच्या खरेपणाची आणि नशिबाची ही परीक्षा आहे. ( त्यांच्याकडे निरखून पहात आणि पाय न वाजवितां तिथून हलकेंच दूर जाते. ) तुम्ही अगदी तयार रहा! मी सांगितलेल्या प्रमाणं वागण्यांत थोडी कसूर झाली तर तें मला रुपायचं नाही. ( स्वगत ) या चोरांना असंच तोंडघशीं पाडल्याशिवाय यांचे डोळे उघडणार नाहीत. ( उघड ) डोळ्याचं पातं थोडं सुद्धा हलवूं नका. मी आत्तां आलेंच हं! ( तेथून एकदम पसार होते. ते दोघे डोळे मिटून तसेच उभे असतात. )

निळू—( काळूला हळूच चिमटा काढीत ) ए काळू! तूं सावध आहेस का घेतलीस समाधी!

काळू—( त्याचा हात ढकलून ) शः, लेका मोठ्यानं बोलूं नकोस. तूं अगदीच खुळा आहेस. जरा धीर धर. आपणाला सोडून ती कांही कुठं पळून जात नाही.

निळू—( हलक्या आवाजांत ) तसं नव्हे रे! कान ताणून जरा कानोसा घे. तिची चाहूल कशी लागत नाही! ( त्याला पुन्हा चिमटतो. )

काळू—निळ्या, चिमटे काय काढतोस? आणखी थोडी कळ सोस. तिच्या मनाचा अजून निश्चय झाला नसेल, कारण हें काम थोडं विकट आहे तूं जरा गप्प बसायला काय घेशील? अशानं ती बिचकेल ना! गिरक्या घेऊन खालीं उतरणाऱ्या कबूतराला मधेंच खडा मारला तर तें उडून जातं.

निळू—काळू, मला हें लक्षण कांहीं ठीक दिसत नाही. अरे, डोळे झाकून कां कुठं असलीं कामं होतात? तूं कांहीहि म्हण, तिनं आपल्या डोळ्यांत धूळ टाकली हें खास! ( दोघे कांही वेळ तसेच मिटल्या डोळ्यांनी तिची वाट पाहतात. नंतर निळू काळूचा हात धरून त्याला ओढतो. काळूहि त्याला तसा ओढत नेऊं लागतो. ) अरे, मला कुठं ओढून नेतोस? तुला दिसत नाही का! म्हटलं मी निळू आहे—तारा नव्हे!

काळू—( डोळे उघडून ) आं, हें फुलपाखरूं गेलं तरी कुठं?

निळू—मी काय सांगूं? यांत तुझाच कांहीतरी काळा कावा असला पाहिजे. डोळे झाकण्याच्या आधी तूंच तिला खुणावून बिथरून ठेवली असावीस.

काळू—माझं लक्ष नाही असं पाहून तूंच तिला कांही कानमंत्र दिला असावास. त्या शिवाय का ती अशी विजेच्या चपळाईनं डोळ्याआड झाली।

निळू—दोन मांजरांनी एकाच लोण्याच्या गोळ्यावर डोळा ठेवला कीं हें असंच व्हायचं. तुला या ठिकाणीं यायला कुणी सांगितलं होतं?

काळू—प्रेम करायचा मक्ता देवानं तुला एकट्यालाच दिलेला नाही. मलाहि मन आहे. ती मलाच निवडणार होती.

निळू—तूं मदनाचा पुतळाच कीं नाही!

काळू—आणि तूं अगदी राजबिंडा तरुणच! काय ध्यान आहे पण! आरतीच करायला कोणी नाही. आपलं नाक कापून मला मात्र अपशकुन केलास! ती तशीच निघून गेली, याला कारण तूंच आहेस. नाही तुला, नाही मला आणि वाल कुत्र्याला!

निळू—काळू, मी तुला एकवार बजावून ठेवतो. तूं जर पुन्हा तिच्या वाटेला गेलास तर तुझा काटा मी काढून टाकीन.

काळू—(डोळे पिंजारून) तिला फितवून वरती मला दम देतोस काय? ही जागा माझी आहे, आणि ती मलाच मिळाली पाहिजे तुझा अर्ज तूं दुसरीकडं टाक!

निळू—(संतापून) तुला ती कशी मिळते हें मी पाहणार आहे. तुझ्या प्रेमाची निवडणूक तूं आणखी कुठं तरी आपल्या सोयीप्रमाणं लढव!

काळू—निळ्या, हें चांगलं नव्हे हं! याचा वचपा काढल्याशिवाय मी राहणार नाही. याद राखून रहा!

निळू—जा! मी असले छप्पन्न बघितलेत. मीहि मेलेल्या आईचं दूध प्यायलो नाही. (एकमेकाकडे रागाने पहात विरुद्ध दिशेने निघून जातात.)

## प्रवेश दुसरा

( स्थळ—वाल्याची झोपडी, अंगणांत त्याची बायको हिरा कांहीतरी काम करीत असते. जवळच एक रिकामी घागर पडली आहे. )

हिरा—दुपार होत आली तरी यांचा अजून पत्ता नाही. आज पाडवा-सणाचा दिवस, पण घरांत धान्याचा एक कण दिखील नाही. जनांत आग मनात आग, अशी स्थिती. कसला हा आमचा संसार अन् कसलं हें जगणं ! दुःखाचा कडू काढा पीत आलेला दिवस कसातरी ढकलायचा. कुठं कुठं म्हणून समाधान मानायला जागा नाही असं झालं तर काम करायला हात तरी कसा उचलेल ! पण मी हें सांगायचं कुणाला ? आपलेच दांत नि आपलेच ओठ ! ( घागर उचलून घेत. )

( ५ )

**जाऊं कशी मी जलभरणा !**
**पाझरतां नयनीं धारा**
**वाढे उरीं वेदना ॥ धृ० ॥**
**गरिबांची करुण कहाणी**
**नच जात जगाच्या कानीं**
**मोल नाही जीवना ॥ १ ॥**
**संसारीं या शेजारीं**
**जन्माचे होतो वैरी**
**विफल सुखाची कल्पना ॥ २ ॥**

( खिन्नपणाने सभोंवार पाहून चालूं लागते. मागून वाल्याकोळी जड पावलांनी येतो. )

वाल्या—अग हिरू ! तशीच मागं ये बघूं ! तुझ्याकडं माझं जरासं काम आहे.

हिरा—( तिथूनच मागं वळून ) कां हाक मारलीत मला ? फावलं वाटतं तुम्हांला आतां यायला ! ( फणकाऱ्याने ) मला थांबायला वेळ नाही. ( तशीच पुढें जाऊं लागते. )

वाल्या—इतक्यांत दिवस कांही बुडत नाही अन् झराहि आटून जात नाही. तोंडाचा चंबू करून तिथंच काय बघत उभी राहिलीस ? मला तुझ्याशीं थोडंच पण जरूरीचं बोलायचं आहे. अग, अशी इकडं तरी ये !

हिरा—( त्रासिक मुद्रेने जवळ येऊन ) मी तुमच्याशीं अशी बोलत राहिलें तर घरांतल्या कामाचा डोंगर कोण उचलील ?

वाल्या—उगीच आवळ्याचा भोंपळा करूं नकोस. ती घागर आधी खालीं ठेव बघूं ! ( घागर काढून घेतो.)

हिरा—तुमच्या मनांत आज आहे तरी काय ? ही काय गोष्टी सांगायची वेळ आहे ? असे दिवसाउजेडीं घरापुढं आपण बोलत उभे राहिलों तर लोक काय म्हणतील—

वाल्या—नवऱ्याला आपल्या बायकोशीं बोलायला कां कुणाची चोरी आहे ? माझ्या समोर अशी उभी रहा. लोक काय म्हणतील याचा विचार नंतर करूं. मी काय म्हणतो तें जरा आधी नीट ऐकून घे !

हिरा--आज पावतर तुमचं थोडं का ऐकून घेतलं. पण रोजच्या रडींत काय खळ पडली असेल तर शपथ ! ' ये रे माझ्या मागल्या अन् कण्या भाकरी चांगल्या '—तशांतली गत. कधीं - मनाजोगता दागिना नाही कीं हौसेसारखं लुगडं नाही. मेलं, माणसानं किती म्हणून सोसायचं ! (मान वळवून पदरानं डोळे टिपते.)

वाल्या—( खिन्नपणानं ) तुझं आपलं सदान् कदा असंच. चेहऱ्याला कायमची सुरकुती पडलेली. बायकोची मर्जी राखणं ब्रह्मदेवाच्या बापालाहि जमायचं नाही. स्त्रीचं मन म्हणजे अळवावरचं पाणी ! क्षणभर काय चमकेल तेवढंच. एकंदरींत नवऱ्याचा जन्म अगदी वाईट—

हिरा—अन वायकोचा काय चांगला !

वाल्या—नवऱ्याच्या नाकांत वेसण घालून त्याला वाटेल तसं नाचायला मिळतं !

हिरा—(वाईट तोंड करून) असं उगंडुणं बोलून मला हिणविण्यासाठी कां इकडं धाव घेतली ! आणि हें काय—रिकाम्या हातानं माघारी कसे आलांत ? आज पाडव्याचा दिवस. घरांत चिमूटभरसुद्धां धान्य नाही. हे दिवस तर किती कठीण अन् त्यांत तुमचा हा असा अवतार !

(३)

**झुरे जीव भोळा, माझा**
**घरांत भरला खरा उन्हाळा ॥ ध्रु० ॥**
**वणवण करितां शिणली काया**
**गमली वांया अवघी माया**
**कां मग मजला छळितां राया !**
**पुरे करा हा चाळा ॥ १ ॥**

वाल्या—ए बये, जरा शांत हो ! तुझी वीज अशी कडाडूं लागली कीं माझ्या छातींत धडकी भरते. तुझ्या या गडगडाटांत मुख्य मुद्दाच मी विसरून गेलों.

हिरा—तुम्हांला मी आपली गरीब गाय सांपडलें. काय कराल अन् काय बोलाल तेवढं थोडंच आहे.

वाल्या—( मनाशीं निश्चय करून ) आतां जास्ती भीड धरून सोय नाहीं. मी तुला स्पष्टच विचारतो.

हिरा—काय ?

वाल्या—तुमचा सांभाळ करण्याकरितां आतांपर्यंत मी अनेक भलींबुरीं कृत्यं केलीं. कित्येक निरपराध जीवांची हत्या करून पापांचे रांजण

रचून ठेवले, या तुमच्यासाठी म्हणून साठविलेल्या पातकांत तुझी पाती असेलच. कारण पत्नि ही पतीची जन्माची मैत्रीण असते !

हिरा—मैत्रीण म्हणजे कांही गुन्हेगारीण नव्हे !

वाल्या—पण तूं माझी खरी बायको आहेस, ही गोष्ट तर खोटी नाही ना ! माझी बायको म्हणून प्रत्येक बाबतींत मला हात देणं हें तुझं पवित्र कर्तव्य आहे.

हिरा—( निर्भीडपणानें ) हवा तसा वळवायला माझा हात कांही मी तुमच्या हातीं दिला नाही. तुम्हीं बाहेर जीं कर्मं केलीत, त्याची आगाऊ परवानगी माझ्याकडून तुम्ही कधीं मिळविली होती का ! मग आतांच माझी साक्ष काढण्याचं कारण काय ? बायको म्हणजे तुम्हांला काय केरसुणी वाटली होय !

वाल्या—( उदास होऊन ) एकूण तुझं खरं स्वरूप आज बाहेर पडलं अन् तें एका अर्थी बरंहि झालं. हिरा समजून हृदयाशीं धरला पण ती अखेर गारगोटी ठरली. इतके दिवस तुमच्याकरतां माझ्या जिवाचं मी रान केलं, वाटेल ते कष्ट सोसून तुमचा चरितार्थ चालविला. त्याचा मोबदला अशा तऱ्हेनं मिळेल, ही कल्पना मला आली नव्हती. माझ्या पापांत तुझा वाटा आहे, ही गोष्ट तुला कबूल नाही ?

हिरा—ज्याच्या तो आपल्या कर्माला जबाबदार असतो. आपला काळा हात दुसऱ्याच्या कपाळीं मारण्यांत अर्थ काय ?

वाल्या—मी इतका वेळ फत्तरापुढं टाहो फोडला म्हणायचा. प्रत्यक्ष तूं माझी अर्धांगी, पण तुझ्या या कठोर बोलण्यानं मला अर्धांगाचा झटका आला आहे. माझंच घर माझ्यावर फिरल्यावर हें काळं तोंड मी कुणाला दाखवूं ! ( दुःखानं तोंड फिरवतो. )

हिरा—दुसऱ्यांचे गळे कापा—दरोडे घाला अन् आपलं घर चालवा, असं तुम्हाला मी कधींच सांगितलं नव्हतं. जे काय आणून द्याल त्यांत समा-

धान मानून—कोंडयाचा मांडा करून—हा संसाराचा रथ तुमच्याबरोबर मी ओढीत राहिलें आहे. निष्कारण इतर उठाठेवींत पडण्याची मला गरज काय, आणि यापूर्वी ती तुम्हांला कधी भासली होती का ! मग आतां ही धावपळ कशाला !

वाल्या—माझ्या काळजींत तूं आणखी नवी भर घातलीस. दमून भागून जरा गार सावलींत बसायला म्हणून जावं तोंच वरून झाडाची फांदी मोडून डोक्यांत पडावी, तसं झालं. मला कांही सुचेनासं झालं आहे. माझी दया तुला येत नाही कां ?

हिरा—अगदी हंडाभर दया येते, पण उपयोग काय ? कुक्कू बाळाप्रमाणं तुम्हांला कडेवर घेऊन कां मिरवूं ?

वाल्या—हेंच कां तुला तुझ्या पतीविषयीं प्रेम वाटतं ?

हिरा—प्रेम वाटतं म्हणून तर तुमच्या मागनं अशी फरफटत राहिलें आहे. नाहीतर केव्हांच जोगीण झालें असतें. केवळ प्रेमाच्या गोड शब्दांनी संसार गोड होत नाही. प्रीतीनं मनाची हौस भागेल पण पोटांतली आग तिनें निवत नाही. प्रेमाबरोबर प्रपंचांत पैशाचीहि सोबत पाहिजे. पण तिच्या नांवानं आमच्या घरांत आवळ्याएवढं पूज्य ! जगाच्या रुक्ष व्यवहारांत प्रीतीचे कोवळे पंख गळून पडतात. माणसाजवळ समाधानाचं निर्लेप साधन असेल तरच जगण्यांत खरी मौज ! इतके दिवस पोटांत उसळणारे उमाळे मी ओठाबाहेर पडूं दिले नाहीत. तोंड दाबून हा बुक्क्याचा मार सहन केला. पण आज वेळ आली म्हणून त्याचा उच्चार केला.

वाल्या—माझींच बोटं तूं माझ्या डोळ्यांत घातलीस. तुझ्या म्हणण्यांत बराच सत्यांश आहे. मीपणाच्या धुंदींत मी भलत्या वाटेला लागलों आणि जगाच्या निंदेचा मानकरी झालों. त्या लाजेनं बाहेर तोंड काढायला मला जागा नाही.

हिरा—असे भागुबाई सारखे इथं विवळत काय बसलात ! जा, कांहीतरी मिळवून आणा. बायका पोरांचं पोट भरतां येत नव्हतं तर हा फास माझ्या गळ्याला कशाला लावलांत ? ( तोंडाला पदर लावून हुंदके देऊं लागते. )

वाल्या—खरी चूक माझी आहे. मीच मूर्ख त्याला तूं तरी काय करणार ! स्वतांच्या हातांनी मी आपल्या तोंडाला काळं फासून घेतलं. हें पातकाचं ओझं मी आतां कुठं लपवून ठेवूं ! माझं म्हणणं तुला पसंत नाही असंच ना ?

हिरा—( निश्चयात्मक वृत्तीनें ) हो, अगदी तस्संच ! पतीच्या अर्ध्या पुण्याची मालकीण पत्नि असते, पण पत्नीच्या अर्ध्या पापाचा धनी पती असतो—असं शास्त्र सांगतं. ज्यानं करावं; त्यानं भरावं ! ( वाल्या दोन्ही हातांनी आपलें तोंड झाकतो. ) असेच बसा डोकं धरून आणि बघा त्यांत काय प्रकाश पडतो का—( घागर घेऊन फणकाऱ्यानं निघून जाते. )

वाल्या—( उद्वेगानें ) बायको म्हणजे सोन्याची सुरी. हाय रे देवा ! काय ही माझी दुर्दशा ! या कठोर जगांत कोणी कोणाचा नाही—सारा मायेचा बाजार. कसला हा संसार ! जीवन हें एक अफाट अन् रखरखीत वाळवंट आहे. तहानेनं व्याकूळ झालेल्या हरिणानं मृगजळाच्या मागं लागून ऊर फुटेपर्यंत पळत सुटावं आणि शेवटीं निराशेच्या बाणानं घायाळ होऊन आ वासून पडावं. जिथं शेजेची बाईल उलटून पडायला मागं पुढं पहात नाही, तिथं इतरांची गोष्ट कशाला ! आपला भोग आपणच भोगला पाहिजे. त्या शिवाय दुसरा इलाज नाही.

( त्याचा मुलगा बहिरू आपल्याच नादांत रंगून गाणें म्हणत येतो. )

(७)

बहिरू—आला दिन हा सोन्याचा
मोद बहरला बालमनाचा ॥ ध्रु० ॥

नाचत नादें गुढी पाडवा
त्या नवलाचा वाजे पावा
सुगंध भरला मधुर फुलांचा ॥ १ ॥

... वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. 3366 नों. दि ............
वि. .. अंक २ रा . क्र. .. ............ ५१

नटली दुनिया नवरंगांनीं
छानदार तीं लेवुनि लेणीं
पुरवा प्रेमें छंद जिवाचा ॥ २॥

( गाणें म्हणून झाल्यावर बापाचा उदास चेहरा पाहून तो चपापतो. ) बाबा, तुम्ही एकटे असे इथं उभे कां ? कुणाची वाट बघताय ?

वाल्या—( त्राग्यानें ) बघतोय आपल्या कर्माची वाट ! तुझा पिंगा जरा बंद कर. चंडोलागत असा ताना मारीत कुठं निघालास ?

बहिरू—मी मघांपासून तुम्हांलाच शोधीत आहे. बाबा ! आज पाडवा आहे. मला सुंदर नवा पोषाख आणतां ना ! हे गबाळ कपडे घालून माझ्या मित्रांत वावरतांना मला फार लाज वाटते. मी आईला विचारलं तर ती म्हणाली बाबांना विचार म्हणून—

वाल्या—तुम्ही दोघं मायलेकरं मिळून अयोध्येच्या बाजारांत नेऊन मला विका आणि आपल्या जिवाची हौस फेडून घ्या. माझ्या आयुष्याचीं गुढयातोरणं कोसळून खालीं पडत असतांना तुम्हाला सणाचे सोहाळे सुचताहेत.

बहिरू—( फुरंगटून ) शेजाऱ्या पाजाऱ्यांचीं मुलं नटून थटून मिरवत आहेत आणि आम्हीं आपलं चिमणी एवढं तोंड करून कोपऱ्यांत बसून रहावं, मग आणतां ना मला नवा पोषाख ?

वाल्या—( गहिवरून ) बहिरू, आपण गरीब माणसं आहोंत. सुखाच्या छायेंत श्रीमंतांनीं हसावं आणि गरीबांनीं दुःखाच्या उन्हांत तळमळत रहावं ! असा या दुनियेचा कायदा आहे.

बहिरू—तें कांही मला माहीत नाही. तुम्ही होय म्हटल्याशिवाय मी इथून मुळीच हलणार नाही. ( रुसतो. )

वाल्या—( त्याला जवळ घेऊन ) असं करूं नये बाळ ! तुला सर्व गोष्टी कळायला हव्यात. तूं आतां मोठा झालास—

बहिरू—अंहं, आई म्हणते की माझा बाळ अजून लहानच आहे.

वाल्या—( त्याच्यापासून दूर होत ) तिनं तुला फारच शेफारून ठेवलाय. फाजील लाडानं मुलं बिघडतात हें खोटं नाही !

बहिरू—हें हो काय बाबा ! तुम्ही नेहमी आम्हांला असं हिडीस फिडीस करतां. मायेचीं माणसं जर अशीं ढकलून देऊं लागलीं तर आम्ही पोरांनीं कुणाच्या तोंडाकडं बघावं ?

वाल्या—मुला, असा एखाद्या खुळ्यासारखा वागूं नको. जरा शहाणा हो ?

बहिरू-( गाल फुगवून ) असं हो काय म्हणतां ? मी खुळा आहे कां हो बाबा !

वाल्या—नाही, फार शहाणा आहेस. तुझा हा हट्ट अन् ही वटवट आतां पुरे कर !

बहिरू—मी आपला जातोच कसा--( जाऊं लागतो. )

वाल्या—थांब जरा ! असा तुरतुर करीत कुठं निघालास ? मी तुला एक प्रश्न विचारतो. त्याचं उत्तर चटकन् दे पाहूं ! चांगला मुलगा आपल्या आई-बापांची इच्छा कधीच मोडत नसतो.

बहिरू—एकच कां, दहा प्रश्न विचारा कीं ! उत्तराला हो काय तोटा ?

वाल्या—तुमच्या रक्षणासाठीं म्हणून माझ्या हातून अमाप पाप घडलं आहे. माझा मुलगा या नात्यानं त्यांतला तुझ्या वाटणीचा हिस्सा तूं उचलणं जरूर आहे.

बहिरू—( कानांवर हात ठेवून ) त्यांतलं मला कांही सुद्धा समजत नाही. एकादा गोड जिन्नस किंवा आवडीची वस्तु आणून द्यायचं बाजूलाच राहिलं आणि म्हणे पाप घेतोस कां ? कांहीतरी वेड्यागत बडबडताय झालं !

वाल्या—छान! माझे पाय तूं माझ्याच गळ्यांत घातलेस. पोटच्या पोरानं आपल्या बापाला वेडा म्हणावं यापेक्षां आणखी दुर्दैव तें कोणतं? तूं माझं ऐकत नाहीस—

वहिरू—तुम्ही कुठं माझं ऐकतां म्हणून मी तुमचं ऐकावं! तुमचं पाप म्हणजे कांही गोंडयाची टोपी नव्हे--आपली ठेवली डोक्यावर अन् निघाला ऐटींत! बसा आपल्या पापाचा हिशेब करीत. माझ्या खेळगडयांना मला भेटायला जायचंय. काय पाप, काय बाप-सारा न्याराच कारभार! ( घाईनें निघून जातो. )

वाल्या—अरे वहिरटा, आपल्या जन्मदात्याला असा संकटांत लोटून जाऊं नकोस! गेला कारटा-आतां कुठला परत यायला. हा मुलगा नसून मागच्या जन्मींचा सूड आहे. चोराचा पोर साव कसा निपजणार! विषवृक्षाला अमृताचीं फळं कुठून येणार? ही विटंबना माझ्यानं सहन करवत नाही. माझं भेसूर दुर्दैव माझ्या डोळ्यांसमोर कसं थयथय नाचत आहे. ज्यांची मी हत्या केली ते सारे जीव अक्राळ विक्राळ रूपं धारण करून मला भेडसावीत आहेत. ( जमीनीकडे पहात ) पायाखालची जमीन दुभंगून जात असल्याचा मला भास होत आहे. हें सारं जग माझ्याभोंवती गरगर फिरूं लागलंय. ‘ खुनी वाल्या, पापी वाल्या ’ अशा कर्कश आरोळ्या माझ्या कानांवर आदळत आहेत. ( कान झाकतो. क्षणभरानें आपल्या हातांकडे पहातो. ) हे माझे हात कसे रक्तानं रंगून गेलेत. त्यांना स्वच्छ करायला सात सागरही अपुरे पडतील! केवढा मी हतभागी अन् अघोर प्राणी! कुठं जाऊं, काय करूं! कोणीच कां माझं नाही? ( “ या जगांत कोणी कुणाचा नाही, ” असे गंभीर शब्द पडद्यामागून ऐकूं येतात. तारवटलेल्या डोळ्यांनीं वाल्या सभोंवार पहातो ) काय, कोणी कुणाचा नाही! खरंच, या मायावी दुनियेंत कोण कुणाचा आहे?

( ८ )

नाहीं कोण कुणाचा!
मना दिसेना नेम कशाचा ॥ ध्रु० ॥

दों दिवसाची येथिल वसती
मूर्तिसवें त्या ढळती ज्योती
कठिण गती दुबळ्यांची जगतीं
साद घुमे करुणेचा ॥ १ ॥

प्रीति जिवाला लावित चटका
परि पाशांतुन होत न सुटका
खेळ कसा हा चाले लटका
ठेवा दूर सुखाचा ॥ २ ॥

( त्याचा मित्र काळू प्रवेश करतो. )

काळू—( त्याच्याकडे निरखून पहात ) वालोजी, असा उदास कां झालास ? अरे, असं कपाळ बडवून घेण्यासारखं झालंय तरी काय ? तूं हें काय आरंभलं आहेस—

वाल्या—इथं उगवायला तुला आतांच फावलं वाटतं ! फुकट कटकट करून माझं तापलेलं माथं आणखी भडकवूं नकोस.

काळू—अरे, पण तुला असं तापायला काय झालंय तें तरी सांगशील कीं नाही ! कसल्या संकटांत सापडला आहेस—हा प्रकार आहे तरी काय ?

वाल्या—( स्वगत ) नात्याचे नाजुक धागे केंव्हाच तुटून गेले. अशा वेळीं खरा स्नेही कदाचित् उपयोगी पडण्याचा संभव आहे. हा आयता आलाच आहे. तेंव्हा यालाहि सुनावून पहावं. [ उघड ] काळोजी, एका काळजीनं मी हैराण झालों आहे. तुझाच काय तो आधार मला उरला आहे.

काळू—तुला मदत करायला मी केंव्हाहि तयार आहे. नाहीतर मी तुझा मित्र कसला !

वाल्या—आजवर अनेक बऱ्या वाईट कामांत तूं मला साथ दिलीस. सुखदुःखांचे कित्येक उन्हाळे पावसाळे एकमेकांच्या संगतींत आपण घालविले

आणि आपल्या मैत्रींत कधी खंड पडूं दिला नाही. कैक प्रवाशांच्या मुंडया मुरगळण्याच्या कटांत तूं माझ्या हाताला आपला हात लावलास. जितक्या उत्साहानं लुटीचा वांटा उचलीत आलास तितक्याच आनंदानं त्या घडलेल्या पातकांतला आपला भाग तूं आपल्या शिरावर घ्यायला यावेळीं सरसावलं पाहिजेस.

काळू—तुझी ही पापपुण्याची पोथी जरा गुंडाळून ठेव. मी आधींच स्वतांच्या ओझ्याखालीं चेंगरून गेलोय. त्यांत तुझ्या बोजाची जादाभर पडली कीं मी जमीनदोस्त होईन—

वाल्या—माझा सवाल तुला कबूल नाही ?

काळू—माफ कर ! कुत्र्याचे पाय मांजराला चिकटविण्यांत काय अर्थ ? हवं तर दुसरं आणखी कसलंही काम सांग. त्यांत जर मी मागं सरलों तर माझं नांव बदलून ठेव.

वाल्या--शेवटीं तूंहि मला दगा दिलास. घर फिरल्यावर घराचे वासे फिरल्यास नवल तें काय ? जिवाभावाचा मैतर म्हणून मी तुझ्यापुढं तोंड वेंगाडलं पण तूं मला चांगलीच ठेवून दिलीस. माझंच नशीव फुटकं—दुसरं काय ? ( जाण्यासाठीं वळतो. )

काळू—एवढया तेवढया गोष्टीचा बाऊ करण्याची तुला खोडच आहे. उभा रहा ! अशी डोक्यांत राख घालून कुठं चाललास ?

वाल्या—( परतून ) डोक्यांतच नव्हे तर साऱ्या अंगाला राख फासणार आहे.

काळू—हें राखेचं वेड तुला कोणी लावलं ?

वाल्या—ज्या आशेवर जिवानं जगांत जगायचं तिचीच राखरांगोळी झाल्यावर वेडाशिवाय दुसरं काय शिल्लक उरणार !

काळू—शहाण्याप्रमाणं चांगला बोलतो सवरतो आहेस, आणि म्हणे मी वेडा. हें तुझं वेड निराळं दिसतंय. मात्र असं वेड पांघरून पेडगांवला जाणं बरं नव्हे.

वाल्या—काळू, मला खरंच मोठं वेड लागलंय. माझ्या अंतःकरणांत एकच भडका उडून गेलाय. हें चोराचिलटाचं लाजिरवाणं जिणं आतां पुरें झालं !

काळू—साप समजून तूं उगाच सुई घोपटत आहेस. आपण कोण याचा आधी नीट कानोसा घे. भलती कल्पना उराशीं बाळगून फशीं पडतील. धड हा लोक नाही अन् तोहि लोक नाही—

वाल्या—या दुरंगी दुनियेचा मला पुरेपूर वीट आलाय. एकदा हें विष आहे, हें कळून आल्यावर पुन्हा तेंच चाटत बसणें, हा मूर्खपणा नव्हे का ! माझे डोळे आज साफ उघडले—माझा मार्ग मोकळा झाला.

काळू—ही शुद्ध तुझी फसवणूक आहे. गरीबानं ठराविक चाकोरी मोडून जाणं धोक्याचं असतं.

वाल्या—जुनी वाट चुकीची ठरल्यावर नवीन वाट कां पाडूं नये ?

काळू—पाखरं हवेंत उडतात म्हणून माशानं पाण्याबाहेर उडी घेऊन चालेल का ! कांही तरी करायला जाशील आणि आपलं हसं मात्र करून घेशील. अरे, कुठंही गेलं तरी पळसाला तीनच पानं !

वाल्या—जग ज्याची पर्वा करीत नाही, त्यानं जगाची तरी पर्वा कां करावी ? या नीरस संसारांत एकमेकांना वाटणारी आपुलकी म्हणजे सकाळचं धुकं—दिवस वर येतांच तें वितळून जातं. जगांत प्राणी हा एकटा येतो आणि एकटाच निघून जातो. तूं आपला रस्ता सुधार. माझं मी पाहून घेईन.

( जाऊं लागतो. )

काळू—( त्याला अडवून ) पण तूं जाणार कुठं अन् करणार काय ?

वाल्या—पाय नेतील ती वाट अन् काय होईल तो थाट ! अंतरींचा जागा झालेला परमेश्वर हाच यापुढं माझा सखासोयरा. मी आतां कुणाचा नाही अन् माझंही कुणी नाही !

काळू—असं माणसांतनं उठून जाणं बरं नव्हे. पोकळ वैराग्य अखेरीस तुला गोता देईल. मारे एकाद्या संताचा आव आणून तूं तरंगत चालला आहेस, पण "अग अग म्हशी, मला कां ग नेशी" असं म्हणत पुन्हा लोळण घेत परत येशील. अरे, जरा विचार कर. का आपली उचलली जीभ अन् लावली टाळ्याला !

वाल्या—माझा निश्चय आतां बदलणं शक्य नाही. माझ्यापुढून तूं चालता हो ! एक क्षणभरही मी इथं थांबणार नाही.

काळू—कुठलीही गोष्ट अशी तडकाफडकी साधत नसते. 'पी हळद कीं हो गोरी' असं करून चालणार नाही. तूं निघालास पण तुझ्या बायकापोरांची काय वाट ?

वाल्या—जो तो आपल्या नशिबाचा ! कसलाच पाश मला गुंतवून ठेऊं शकणार नाही. पंख फुटलेल्या पाखराला घरटं अपुरं पडतं !

काळू—कानांत वारं शिरलेल्या वासरागत असा मोकाट कां सुटला आहेस ? तूं आमच्या टोळीचा नायक. खांब कोसळल्यावर छप्पर कसं टिकेल !

वाल्या—(बेफिकीरपणानें) आभाळ डासळलं तरी माझं पाऊल मी मागं घेणार नाही. तुमचा गाडा तुम्ही खुशाल हाकीत बसा !

काळू—पण तुला जाऊं देणं मला परवडणार नाही. एका फटकाऱ्यानं इतक्या दिवसाच्या मैत्रीची गांठ तुटेल का ! आणि तूं निघून गेल्यावर आमची स्थिती सुकाणूं तुटलेल्या नावेसारखी होईल.

वाल्या—ही नाव फुटली तरी मला त्याची खातर नाही. माझ्या प्रेमापेक्षां तुमचा स्वार्थच तुम्हांला अधिक प्यारा आहे. काळू ! माझा मानलेला जिवलग मित्र म्हणून हा अखेरचा एक शब्द तरी ऐक ! लूटमारीचा हा किळसवाणा धंदा यापुढं तूं पण सोडून दे. माणसानं माणसांचे गळे कापणं, हें चांगलं आहे का ? बरं, नमस्कार ! मी येतो आतां !

काळू—तूं खूप जाशील, पण मी तुला सोडला पाहिजे ना! तूं डोळे मिटलेस म्हणून मी स्वस्थ रहायचा नाही.

वाल्या—( आवेशानें ) माझ्या कामांत नसती लुडवूड न करतां नीट निघून जा! नाहीतर या कुऱ्हाडीचा हा शेवटचा घाव तुझ्या मस्तकांत घालून त्या ताज्या रक्तानं आजवरच्या पापाला तिलांजली देईन. प्रत्यक्ष काळहि आतां मला परतवायला समर्थ होणार नाही. ( कुऱ्हाड उगारून ) दूर होतोस कीं—( काळू घाबरून दूर होतो. )

काळू—तुझ्या हातून मरायला माझा जीव कांही इतका वर आला नाही. जा, अगदी खुशाल जा! कुठल्याहि कडयावरून खाली उडी घे अन् थेट स्वर्गांत जा. तुला मी बिलकूल अडथळा करणार नाही. मृत्यूची छाया पडलेल्या रोग्याला औषध नकोसं होतं. जा! तुझं कर्म तुझ्याबरोबर! ( बाजूला होतो. )

वाल्या—माझ्या छातीवरचा भार दूर झाल्याचा आनंद मला होत आहे. आतां मी आणि माझा परमेश्वर! ( हातांतल्या कुऱ्हाडीकडे पहात ) ही कुऱ्हाड—निरुपद्रवी जीवांच्या कत्तलीची जळती निशाणी—हिची सोबत आतां इथंच संपवावी. ( कुऱ्हाड फेकून देतो. )

(९)

असार हा संसार, खरोखर
स्वार्थ पसारा घातक सारा
मायेचा बाजार ॥ धृ० ॥

निशिदिन शिणला जीव बिचारा
अवचित वितळे रम्य मनोरा
ताप रिकामा येत न कामा
प्रेमाचा परिवार ॥ १ ॥

रानांतिल या फळें विषारी
साधिल दावा क्रूर शिकारी
येथुनि जा रे दूर पाखरा !
आग भरे अनिवार ॥ २ ॥

नवा प्रकाश माझ्या हृदयांत डोकावत आहे. या शुभ घटकेला आपल्या नव्या आयुष्याला सुरवात करावी. ( निघून जातो. काळू पुढें येतो. )

काळू—( त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात ) ही अवदसा या मूर्खाला कुठून आठवली कोण जाणे ! सारी हयात चोऱ्यामाऱ्या करण्यांत खर्च झाली आणि उतार वयांत उपरति झाली. करून करून भागली अन् देवपुजेला लागली ! शेंदूर लिंपून कां कुठं दगडाचा खरा देव होतो ? कुठल्या-तरी झाडाखालीं वारा पाणी खात टाळ कुटत बसेल झालं—दुसरं काय ? ऐका हो ऐका ! वाल्या कोळी वेडा झाला, वाल्या फुकट गेला ! ( जातो. )

---

## प्रवेश तिसरा

( स्थळ—अरण्य, काळूला शोधीत तारा येते )

तारा—असल्या दाट जंगलांत काळूला कुठं म्हणून शोधायचा ! घाईनं येतांना मधेंच मी वाट तर चुकली नसेन ना ! ‘ धरलं तर चावतं अन् सोडलं तर पळतं. ’ अशी माझी अवस्था झाली आहे. प्रीतीची वाट इतकी वेडी वाकडी असते कां ? तो निळ्या तसा अन् हा काळ्या असा ! कुणाचा म्हणून भरंवसा धरतां येत नाही. पण यांतून मार्ग काढल्याशिवाय माझा निभाव लागायचा नाही. एकदा काळूला गांठून सारा खुलासा करून घ्यावा म्हणून मी धडपडत आहे, पण हा कुठं काळं करून बसलाय तें देव जाणे ! मांडवावरनं घसरलेली वेल जवळच्या झाडाचा आश्रय घेते. निराश मनाला नवी आशा पुन्हा टवटवी आणते—

(१०)

रंग नवा रमवी नयनां
मिळेल कां तें प्रेम मना ॥ धृ० ॥
सखा जिवाचा जगीं असावा
भेदभाव अवघा जावा ॥१॥

टकमक बघतां मोहक तारा
मेघ निळा गगनीं आला
सहजच हसला चंद्र लाजरा
नाद निराळा दुमदुमला ॥ २ ॥

गातां रानीं मंजुळ गाणीं
व्याकुळ झाली फुलराणी
कोण सोडविल माझें कोडें
गोड जिवाला वेड जडे ॥ ३ ॥

( काळू प्रवेश करतो. )

काळू—( विस्मयानें ) या वेळीं तूं नेमकी इथं कशी आलीस ?

तारा—येऊं नको तर काय करूं ! त्या मेल्या निळ्यानं माझी अगदी पाठ पुरवली आहे. मी घरीं गेलें तर तिथं हा खडा मारल्यागत हजर. मला त्याची फार भीति वाटते.

काळू—काय म्हणाला तुला तो ?

तारा—दुसरं आणखी काय म्हणणार ! आपला सरळ आंत आला नि त्यानं माझा हात धरला. साऱ्या मुलखाचा निर्लज्ज आहे मेला !

काळू—त्याला साफ सांग कीं, पुन्हा माझ्या दारांत पाऊल टाकूं नकोस म्हणून. तो यायच्या आंत तूं दार कां बंद केलें नाहीस ?

तारा—मी पुढलं दार लावून घेतलं तर तो मागील दारानं आंत घुसला.

काळू—त्याला चांगला हात दाखवायचा होतास.

तारा—मी बाईमाणूस आणि त्यांतून घरांत एकटी ! तो तर अगदी तर्र झालेला होता. मला तो थोडाच बधणार ! त्यानं माझ्याशीं दांडगाई आरंभली. मी भीतीनं मनांत थिजून गेलें.

काळू—जवळपास कोणी नव्हतं कां ?

तारा—माझं घर गांवाच्या एका टोकाला आहे. त्यांतून मी इथं नवखी असल्यानं शेजारचीं माणसं माझ्याशीं फटकून वागतात. आणि या काळानं तर माझा गळाच धरला.

काळू—मग त्याच्या तावडींतून तूं सुटलीस कशी ?

तारा—मी त्याला हरतऱ्हेनं सांगून पाहिलं. पण तो कांही केल्या वळणा-वर येईना. त्याचा आपला एकच हेका " त्या काळूचा नाद सोड अन् माझ्या-बरोबर चल ! " त्याच्याबरोबर जाऊन मी काय करूं ? त्यानं एक लाज सोडली पण तसं करून मला चालेल कां !

काळू—मला वाटलं नव्हतं तो या थराला जाईल म्हणून. त्या गाडवानं अगदीच ताळ सोडला तर !

तारा—मी भारी गोंधळून गेलें. काय करावं तें मला कांही सुचेना, अन् तो तर धरणं धरून बसला. आतां या भोगाला काय करावं ! कुठली त्याच्याशी ओळख झाली असं मला होऊन गेलं.

काळू—मी असतांना त्याच्या ओळखीची गरज तुला कां वाटली ? तुझ्या चंचलपणाचं हें फळ आहे बरं !

तारा—मी त्याच्याकडं मुद्दाम का गेलें होते. सहज एकदा वाटेत गाठ पडली. मी त्याच्याकडं पुन्हा वळून सुद्धां पाहिलं नाही. तोच लाळ घोटत माझ्या पाठीमागं लागला. या लोचटपणाला काय म्हणावं ? मी जरा त्याची

गंमत करावी म्हणून मनाशीं ठरवलं पण हें भलतंच झालं ! आतां त्यानं माझा गळाच धरलाय—

काळू—त्याच्या पाठोपाठ जावं असं तेव्हांच मला वाटलं होतं. पण तो इतका पागल असेल, याची मला कल्पना नव्हती. त्यावेळीं मी तिथं असतो तर त्याला तिथल्या तिथंच खलास केला असता. माझ्या तारेला त्रास देतो म्हणजे काय गोष्ट आहे ?

तारा—तो मेला माझ्यापुढनं मुळीच हलेना. माझी छाती धडधडूं लागली. कोणाला हाक मारावी तर तोंडातून शब्दहि उमटेना. तेवढयांत त्याची नजर चुकेवून मी जरा बाजूला झालें मात्र, तेवढयांत त्यानें आपल्या कमरेचा खंजीर काढून माझ्यावर रोखला. हा आतां काय करील या धास्तीनं माझी अगदी गाळण उडून गेली. ( भ्याल्यासारखें दाखविते. )

काळू—( दांत ओठ खात ) थांब ! तो लेकाचा फार माजलाय. तो पुन्हा माझ्या हातांत सापडूं दे तर खरा. त्याला या जगांतूनच नाहीसा करून टाकतो. बरं, पुढं काय झालं ?

तारा—अरून फिरून त्याचं आपलं म्हणणं हेंच—" माझ्याशीं लग्न करीन असं वचन दे. नाही तर तुला अन् त्या काळूला, दोघांनाहि स्वर्गाची वाट दाखवीन " ! आतां तूंच सांग बरं, असल्या पिसाटाच्या हातांत आपली मान कोणती प्रेमळ तरुणी द्यायला तयार होईल ?

काळू—( ऐटीनें ) तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. त्याला माझ्यासारखाच दिलदार सौंगडी पाहिजे. बरं, त्यावर तूं काय केलंस !

तारा—ठकाला ठक झाल्याशिवाय उपाय नाही, असं मी मनांत आणलं आणि थोडी लाडीगोडी लावून त्याला तसं वचन—खरं नव्हे हं—खोटंच वचन दिलं. तेव्हां तो समंध जरा शांत झाला. मग मी त्याचा हात धरून त्याला बाहेरची वाट दाखविली. पण जातां जातां त्यानं मागं वळून अशा भेसूर

नजरेनं माझ्याकडं पाहिलं म्हणतोस—माझ्या काळजाचं पाणीच झालं. तो इतक्यांत परत येत नाही याची खात्री करून घेतली अन् इकडंच धावत आलें. पुन्हा गांवांत जायला माझं मन धजत नाही.

( भय वाटल्याचा आविर्भाव करते. काळू तिला जवळ घेतो. )

काळू—तारू ! तूं अशी घाबरूं नकोस. मी तुझ्याजवळ असतांना तुझं नांव काढायला त्याची काय माय व्यायली आहे ? तुझं प्रेम माझ्यावर आहे हें तूं त्याच वेळीं त्याला माझ्यासमोर सांगायला हवं होतंस, म्हणजे त्याची जीभ आपोआप लुली पडली असती. औषधावांचून खोकला गेला असता—

तारा—पण आतां तुला सांगते ना ! माझं प्रेम तुझ्यावरच आहे—( लाजते )

काळू—हें अगदी खरं आहे ना ! नाहीतर पुन्हा आपलं मागील अंकावरून पुढं चालूं असं होईल. एकदा ठेच लागली म्हणजे जपून चालावं लागतं.

तारा—तो निळ्या मला भेटावा म्हणून मी नवस का केला होता ! तोच आपण होऊन माझ्या गळ्यांत पडला, हा काय माझा गुन्हा आहे ?

काळू—इथंच तुझी पहिली मोठी चूक झाली. पहिल्याच खेपेला तूं त्याला झाडला कां नाहीस ? भलत्याच ठिकाणीं भीड धरली कीं कुसळाचं मुसळ होऊन बसतं.

तारा—जितका कोळसा उगाळावा तितका तो काळाच ! मी फिरून त्याचं नांवहि उच्चारणार नाही. तूंहि मागलं कांही मनांत न आणतां माझं म्हणणं लक्षांत घे. गेली ती गंगा अन् राहिलं तें तीर्थ !

काळू—हें तीर्थ घ्यायला माझी ना नाही. पण त्यानं मनाची तहान भागेल ना ! पहा बरं, तूं फिरून कांही चाळे केलेस तर ते मला बिलकूल मंजूर होणार नाहीत. आधी कडू अन् मागनं गोड ! नीट विचार कर आणि मगच होय म्हण. जळतं घर भाड्यानं घ्यावं कुणी !

तारा—तुझी अजून खात्री कशी पटत नाही! मी इतकी जीव तोडून सांगते आहे पण तुझं आपलं पहिलंच पुराण चालू आहे. खरंच, तुला सोडून मी कुठंहि जायची नाही. अगदी तुझ्या गळ्याशपथ!

काळू—माझ्या गळ्यावर हात मारायला तुझं काय जातंय? चंचल स्त्रीच्या मनाचा अंत लागणं कठीण असतं—

तारा—पुरुषाचं हृदय इतकं कठोर असेल असं मला वाटलं नव्हतं. माझ्या प्रेमाची हाक तुला कळत नाही ना! भिक्षेसाठीं मी पदर पसरला पण त्यांत धोंडा पडला. तुला जर माझं एवढं ओझं वाटतंय तर मी तरी जास्ती आग्रह कशाला करूं! झाला इतका आपला सहवास पुरे झाला. तुझी आणि माझी ही शेवटची भेट-( रागानें तोंड फिरवते. )

काळू—खरंच रागावलीस तूं? ( तिला जवळ घेत ) माझी बाई ती! अशी गप्प काय राहिलीस-काय होतंय तुला? ( उसन्या रागानें ती त्याच्या-पासून दूर सरते. तो पुढं होऊन तिचा हात धरतो. )

तारा—हा धरलेला हात सोडणार असशील तर पुन्हा मी तुझ्याशीं कधी कधी म्हणून बोलणार नाही. तुझा खेळ होतो पण माझा जीव जातो !

काळू—मी आपलं तुझं मन बघितलं. रुसव्या फुगव्यांतच प्रेमाची खरी मजा असते. तोंड गोड करून माझ्याकडं एकदा बघून हास बरं ! बोलत कां नाहीस? पुन्हा लहर आली वाटतं! हा मुक्याचा कारभार मला झेपत नाही.

तारा—हीं सारीं सोंगं मला समजतात म्हटलं. मोकळ्या मनानं वचन दे म्हणजे माझा संशय फिटेल.

काळू—( हर्षभरानें ) हें घे वचन! ( तिचा हात धरून तिला आपल्या-कडं ओढतो. ती आढेवेढे घेते.)

तारा—तिकडं पाहिलंस कां? त्या बहरलेल्या वृक्षाला ती फुललेली लता कशी बिलगून राहिली आहे! तुझ्या शेजारीं असंच उभं राहण्यांत माझ्या जिवाला नवी पालवी फुटत आहे.

काळू—झालं ना तुझं समाधान ! ( ती मान हलवते. ) अशी माझ्याकडं रोखून काय बघतेस ?

तारा—जें बोलून दाखवितां येत नाही तें डोळ्यांनीं ओळखून घेण्यांत मनाला सुख वाटतं.

काळू—माझ्या मनांतली एक गोष्ट मी तुला सांगतो. येथून आपण दोघं दुसऱ्या दूर गांवीं जाऊं आणि त्या ठिकाणीं आपल्या प्रीतीच्या संसाराचं खरं झालेलं स्वप्न पाहूं !

तारा—मलाहि तसंच वाटतं. नव्या वनांत, नव्यानं बांधलेल्या घरट्यांत, आवडत्या राघूबरोबर नांदायला मंजुळ मैनेला आनंदच होईल—

(११)

आवडला बोल हा, जिवाला
हासत आला वसंत पहिला
हार मनोहर गुंफिला ॥ धृ० ॥

मोहन माझा मंजुळ बोले
प्रेमभावें जीव डोले
दोन घडीचा डाव रंगतां
गोड विसावा सापडला ॥ १ ॥

( त्याचा हात धरून ) तुझे गोड बोल ऐकून माझ्या मनाला नव्या प्रीतीचे पंख फुटत आहेत. चल, या जुन्या जगांतून आपण भुर्रदिशीं दूर उडून जाऊं ! ( काळू कसल्यातरी विचारांत मग्न झालेला दिसतो ) कां, आतां विचार कसला करतोस ?

काळू—[ आर्जवी मुद्रेनें ] तारू, एक क्षणभर थांब !

तारा—एकदा ठरल्यानंतर माणसानं असं मागं पुढं करू नये.

काळू—तुझ्याशीं बोलण्याच्या नादांत एक गोष्ट तशीच राहून गेली. माझा बाळमित्र वाल्या कोळी हा मघांशीं माझ्याशीं भांडून घराबाहेर पडला आहे. त्याचं कसं होईल ही चिंता मला लागली आहे.

तारा—इथून एकदां जायचं म्हटल्यानंतर इथं काय होईल ही काळजी कशाला ! आपण भलं कीं जग भलं ! अपल्या नव्या मैत्रीचं हितगूज रंगत असतांना हें जुन्या ओळखीचं शेपूट तूं आपल्या पाठीला कां चिकटवून घेतोस ? मला तुझं भारीच नवल वाटतं.

काळू—असं म्हणून कसं चालेल ! त्याचा नि माझा फारां दिवसांचा घरोबा आहे. माझ्या डोळ्यांदेखत माझ्या मित्राचं घर खालीं यावं, हें मला बघवत नाही. तो बुवा होऊन गेल्याचं त्याच्या बायकोला कळतांच ती आकाश-पाताळ एक करील. नवऱ्यावर तिचं तसं फार प्रेम आहे. पण काय असेल तें देवाला ठाऊक ! दोघांचं कधी म्हणून पटत नाही—

तारा—मग जें पटत नाही त्यांत तूं आपलं लक्ष कां घालतोस ? तीं दोघं नवरा बायको कांही का करीनात—आपल्याला काय त्याचं ? हें विकतचं श्राद्ध तुला कशाला हवं ?

काळू—माणसानं केवळ आपल्या पुरतंच पाहूं नये. झालेला प्रकार तिच्या कानांवर घालून तिला जागं करावं. मग ती आणि तिचं नशीब !

तारा—तें कांहीहि असो ! माझ्यापासून एक क्षणभरहि मी तुला दूर जाऊं देणार नाही. ऐन वेळीं कसलं तरी खुसपट काढून माझ्या हातावर तुरी देण्याचा तुझा बेत असावा. तुझ्यासाठीं माझा जीव कसा कासावीस झालाय अन् तुझ्या मित्राचा तुला पान्हा फुटलाय. याला काय म्हणावं !

काळू—तूं आतां कांही म्हणूं नकोस. मी असाच जाऊन वाल्याच्या बायकोला त्याची वाट दाखवून येतो. तोंवर तूं इथं उभी रहा. एवढं माझं कर्तव्य मला करूं दे. ( जाण्यासाठीं वळतो. )

तारा—( व्याकुळ होऊन ) इथं असं एकटं उभं रहायला माझ्या मनाला धीर होत नाही. तूं तिकडं जाशील अन् तो समंध येऊन माझ्या मानगुटीवर बसेल !

काळू—( पुन्हा परतून ) एक घटकाभर त्या पलीकडच्या झुडपांत तूं लपून रहा. तूं मुळीच चिंता करूं नको. एवढं काम उरकून मी चटकन् परत येतो. ( जातो. )

तारा—माझी आठवण मात्र असूं दे. नाहीतर तिकडंच अडकून पडशील ! तो निळ्या टळला पण हा काळ्या बावचळला. एक खळगा चुकविला तर दुसऱ्यांत तोल जाऊन पाय मुरगळला ! या चोरांच्या खेचाखेचींत माझ्या प्रेमाची कुचंबणा मात्र झाली. बगळलं तर अडतं अन् गिळलं तर अडकतं-- मिळून काय दोन्हीकडून अडचण ! थोडा वेळ याची वाट पहावी. परत आला तर ठीक, नाही तर आपली वाट आपण धरावी हें उत्तम--[ सभोंवार पहात निघून जाते. ]

---

## प्रवेश चवथा

( स्थळ—अरण्य, वाल्या घाईनें निघाला आहे. पुढून हिरा येते. तो तिला टाळण्याचा प्रयत्न करतो.)

हिरा—(गहिवरून ) माझ्याशीं बोलायचं नाही असा पण केलाय कां ? असे निष्ठुर होऊं नका. या पायाच्या दासीवर दया करा ! ( ती त्याच्यापुढें पदर पसरते. वाल्या न बोलतां तिला वळसा घालून जाऊं लागतो. ती त्याला अडविते.)

वाल्या—( कठोरपणानें ) आल्या पावली तू परत जा पाहूं ! मी तुझा कोणी नाही—माझी वाट लवकर मोकळी कर !

हिरा—तुम्हांला घेतल्याशिवाय मी परतायची नाही ! मला न कळवितां तुम्ही असे एकटे कुठं निघालांत ? मी तुमची आहे—

वाल्या—नाही, मुळीच नाही ! मी तुझा नाही अन् तूंहि माझी नाहीस. आतां माझा मी एकटा आहे—मला जाऊं दे !

हिरा—पण तुम्ही जाणार कुठं ?

वाल्या—वाट फुटेल तिकडं !

हिरा—त्या वाटेनं मलाहि यावं लागेल. पतीच्या मागून जाणं हा सतीचा धर्म आहे. तो मला पाळलाच पाहिजे.

वाल्या—झाली एवढी माझी शोभा अन् तुझी सोबत पुरे आहे. यापुढं तुझी नि माझी वाट निराळी !

हिरा—ती निराळी वाटली तरी दोघांनीं मिळून जायला हवं !

वाल्या—रानांतलीं दोन पाखरं संध्याकाळीं लांबून येऊन एका झाडावर बसतात. रात्रीच्या वेळीं त्या निवांत जागीं घुमविलेले अस्फुट सूर वाऱ्यावर सोडून, सकाळच्या प्रहरीं दोन दिशांनीं तीं दूर निघून जातात.

हिरा—स्वैरपणानं एक दोन भराऱ्या मारून एकमेकांचं गुपीत विसरून जायला आपण माणसं म्हणजे कांही रानचीं उडतीं पाखरं नव्हेत ! आपली जन्माची गांठ पडली आहे. ती अशी सुटेल कशी ?

वाल्या—सुटली नाही तर तोडून टाकीन !

हिरा—तें आतां तुमच्या हातीं नाही. जिथं तुम्ही तिथं मी ! झाडाजवळून सावली कधी तरी निराळी राहील काय ?

वाल्या—त्या सावलीनंच अंगाला चटका बसल्यावर वाटसरूनं तिथून जाऊं नये तर काय तिथंच तळमळत पडावं ?

हिरा—हा दोष त्या सावलीचा नसून सभोंवार पसरलेल्या प्रखर उन्हाचा आणि तापलेल्या जमिनीचा तो गुण आहे. त्या वाटसराचा प्रेमळ सोबती

आपली जीवनछाया त्याच्यावर पसरायला सिद्ध असतांना त्यानं इतकं वाईट वाटून कां घ्यावं ?

वाल्या—गोड बोलून तूं मला मुरळ घालूं पहातेस !

हिरा—तुम्हांला भुलवून मला असा कोणता स्वार्थ साधायचा आहे. मला दूर लोटूं नका ! पाण्यापासून लाट कधी बाजूला करतां येईल का !

वाल्या—तें पाणीच आटलं तर ?

हिरा—ती लाटही त्या पाण्याबरोबर सती जाईल !

वाल्या—असा वाद घालून हा प्रश्न सुटणार नाही. तुझं नि माझं आजपर्यंत पटलं नाही—

हिरा—आणि यापुढं पटणार नाही या कल्पनेनं हें फाटाफुटीचं धोरण स्वीकारणार होय ? मी तसं तुम्हाला मुळीच करूं द्यायची नाही. आपल्या आयु-ष्याचे धागे इतके गुंतून गेले आहेत कीं, ते आतां परस्परांपासून अलग करणं आपणा दोघांनाहि शक्य नाही. जुळलं नाही तरी तें आपुलकीनं जुळवून घेण्यां-तच जीवनाचा नवा गोडवा वाटूं लागतो. उन्हाळ्यांतच वनाला नवी पालवी फुटते.

वाल्या—पण ती उसळणाऱ्या झळांनी आपोआप कोमेजून जाते—

हिरा—आकाशींच्या अमृतधारांनी तिला पुन्हा नवा तजेला चढतो !

वाल्या—तें कांहीहि असलं तरी मला तुझ्याजवळ यापुढं राहतां येत नाही. दोन बाजूंनीं डोंगरांतून वहात आलेले दोन झरे, कांही काळ एकत्र येतात पण मधेंच त्यांना वेगळं वळण लागून त्यांचे प्रवाह बदलूं शकतात.

हिरा—हें खरं मानलं तरी अखेरीं त्यांना एकाच ठिकाणीं मिळावं लागतं !

वाल्या—माझ्यापासून तुला सुख मिळालं नाही—

हिरा—तसं तें नसून माझ्या हट्टवादी स्वभावानें मी तुम्हाला दुःख दिलं. मला त्याचा फार खेद होतो. यापुढं मी तशी वागणार नाही.

वाल्या—आपलं लग्न झाल्या दिवसापासून मी पहात आहे. कांही तरी कटकट उत्पन्न व्हावी आणि आपण दोघांनी आपलं आंबट तोंड करून दूर बसावं. यांत कांही गोडी आहे कां ? तूंच सांग बरं ! आधीं गरिबीचा प्रपंच अन् त्यांत आपला हा छत्तीसाचा आंकडा—

हिरा—झालं गेलं विसरून आणि गोडीगुलाबीनं वागून तो आकडा त्रेसष्टाचा करून घेतां येईल. आपल्या मनाविरुद्ध मी पुन्हा कधी जाणार नाही. मग माझं आपण ऐकणार ना !

(१२)

**निष्ठुर कां झालां, रमणा !**
**प्रेमळ या माना वचना ॥ धृ० ॥**

**सोडुनि रुसवा गोड बोला**
**कंठ माझा दाटला**
**येत पुढें जरि संकट मोठें**
**प्रेम खरें तें परतेना ॥ १ ॥**

**सोबत देतां एकमेकां**
**नेऊं परतीरा नौका**
**स्वप्न नवें हें जीवन पाहे**
**म्हणा आपुली मला पुन्हा ॥ २ ॥**

वाल्या—या मायामोहांत पुन्हा मी पडणार नाही. आपणा दोघांना भांडण केल्याशिवाय करमत नाही. दोन भांडीं पुन्हा जवळ आलीं कीं त्यांतून नाद हा निघणारच ! माझ्या नादीं लागून तूं आपल्या जिवाचा घात करून घेऊं नको—

हिरा—हा माझा जीव आतां माझा राहिला नाही. मी तो केव्हाच तुमच्या हवाली केला आहे.

वाल्या—तो तुझा जीव मी तुला परत करतो.

हिरा—तसा तो परत घेतां यायचा नाही. उमललेल्या फुलाची पुन्हा कळी होत नसते.

वाल्या—पण तें फूल दगडावर पडून फुकट चाललं आहे.

हिरा—जगाला तो दगड वाटला तरी त्या फुलाचा तो देव आहे. त्याच्या पायीं स्वतांचं हृदय ठेवण्यांत त्या फुलाला दुःख न होतां उलट सुखच वाटेल

वाल्या—तुझ्याशीं शब्दांचा खेळ खेळून माझी सुटका होणार नाही. माझं मन पालटणं शक्य नाही. तूं आलीस तशी परत जा! प्राण गेला तरी मी मागं म्हणून वळणार नाही—

हिरा—माझ्या सौभाग्याचा हा अमोल ठेवा असा वाटेवर टाकून या फुटक्या कपाळानं मी घरीं परत कशी जाऊं? जिथं हे पाय तिथंच माझा स्वर्ग!

वाल्या—तुला परत गेलंच पाहिजे. तुझ्या साखळीनं माझे पाय बांधल्या-मुळं मला सारखं ठेचकळून पडावं लागलं. तूं इथून नीट निघून जा!

हिरा—नका, असं बोलूं नका! पतीवांचून सतीला गती नसते. माझं न ऐकतां तुम्ही जाणारच असाल तर माझ्या हृदयावरूनच तुम्हांला चालत जावं लागेल! हे पाय मी कधींहि सोडणार नाही—( ती त्याच्या पायाला मिठी मारते. वाल्याचा कंठ दाटून येतो. त्याला पुढें पाय टाकवत नाही. क्षण-भरानें हिराला उचलून तो आपल्या हृदयाशीं धरतो. )

वाल्या—( अभिमानानें ) मला वाटलेली गारगोटी शेवटीं हिरा ठरली.

हिरा—मला सोडून आतां कुठंही जायचं नाही हं!

वाल्या—माझ्या मनाला लागलेली तळमळ तुला मी कशी सांगू!

हिरा—तुम्हांला आठवतं कां ? चौथा महिना संपून वहिरूला नुकताच पांचवा महिना लागला होता. माझ्या बाळाला तुम्ही जीव कीं प्राण करायचे. त्या दिवशीं उजाडतांच कांही कारणावरून आपला असाच खटका उडाला होता. तुम्ही सकाळीं वैतागानं घरामधून माझ्यावर रागावून निघून गेलांत. काळजीनं माझा जीव कसा टांगणीला लागलेला होता. तिन्हीसांज टळून गेली तरी तुमची स्वारी घराकडं परतली नाही. मला चैन पडेना आणि बाळ कांही केल्या राहीना. तसाच बाळाला उराशीं घेतला अन् तुम्हांला शोधायला म्हणून बाहेर पडलें. आकाश काळ्या ढगांनीं भरून आलं होतं. रागाच्या भरांत तुम्हीं आपल्या जिवाचं कांही बरं वाईट करून घेतलं कीं काय, या कल्पनेनं माझ्या सर्वांगाला थरकांप सुटला ! मी तुम्हाला किती हाका मारल्या पण त्या वादळी वाऱ्यांत विरून गेल्या. बाळ सारखा रडत होता अन् मी तुमच्यासाठीं वेडी होऊन तुम्हांला हाकारीत होते. इतक्यांत मोठा कडकडाट होऊन डोळ्यापुढं सळकन् वीज चमकली, आणि मला भोवळ आली. तेवढ्यांत पसरलेल्या दाट काळोखांतून वाऱ्याच्या वेगानं तुम्हीं मला आणि माझ्या लहान लाडक्याला सावरून धरलंत. तुमच्या प्रेमाचा आसरा मिळतांच बाळ शांत राहिला. आपल्या दोघांच्या डोळ्यांतून अश्रूंची रिमझिम चालू होती. आकाशाच्या मिटलेल्या डोळ्यांतूनही अश्रुबिंदू पाझरूं लागले. सारी सृष्टी देखील गहिवरून गेली होती. त्या प्रीतीच्या तिरंगी आसवांत नव्या आनंदाचं चांदणं भरून राहिलं होतं—

वाल्या—मधुर स्मृतींच्या अमृतानं संसारांतल्या निराशेचं विष प्रेमी जीव पचवून टाकतो. गोड सहवास हा सुखाचा गाभा आहे !

हिरा—मला सोडून तुम्ही पुन्हा दूर जाणार नाही ना !

वाल्या—असं काय करतेस हिरू ! आजचा हा प्रसंग मोठा अवघड आहे. आतापर्यंत केलेल्या पातकांचा पाढा माझ्या निर्दय दैवापुढं मला वाचून दाखविला पाहिजे. अगणित अपराधांनीं आणि दुष्कृत्यांनीं माखलेले हे माझे हात निर्मळ झाल्याशिवाय मला खरं समाधान मिळणार नाही. अनेकांचे शिव्या

शाप माझ्या कपाळीं चढले आहेत. ते पुसून टाकण्याचं साधन मला मिळेल तेव्हा मान वर करून जगाकडे बघण्याचं धैर्य माझ्या अंगीं येईल. गमावलेली माणुसकी पुन्हा कमावल्याविना माझ्या मनाची होणारी तगमग थांबणार नाही. यासाठीं कांही काल तुझ्यापासून दूर राहण्याचं मी ठरवलं आहे. एका दिव्य संदेशानं माझं निजलेलं हृदय जागं झालं आहे. त्या आवाजाचा शोध करीत मला निघालं पाहिजे. माझ्या वीचभर घराच्या जगांत मी रमून गेलों आणि घराबाहेर तळमळणारं जग मला पारखं झालं. ( एकदम गंभीर होऊन ) तें पहा ! कोणीतरी अस्पष्ट पण तेजोमय आकृती मला बोलावीत आहे. खरी सती ही पतीची स्फूर्तिदेवता असते. आपल्या अमृत बोलांनीं कर्तव्य करायला ती त्याला धीर देते.

हिरा—तुमचं अंतःकरण इतकं थोर आहे हें पाहून मला आकाश ठेंगणं झालंय. पुरुषाप्रमाणं स्त्री देखील त्याग करूं शकते ! मी तुमच्या कार्याच्या आड येऊं इच्छित नाही. जें तुमचं सुख तेंच माझं सुख !

वाल्या—( समाधानानें ) दोघांमधला दुजेपणाचा पडदा नाहीसा झाल्या-मुळं मनाला मागं खेचणारी हुरहुर आज दूर झाली. तुझी मंगल प्रीती मला सोबत देऊन माझा मार्ग उजळ करील. ये, अशी माझ्यासरशीं ये ! तुला एक-वार डोळे भरून मला पाहूं दे. ( हिरा त्याला आलिंगन देते. ) बोल ! अशी अबोल कां बनलीस ? तुझ्या डोळ्यांत हे अश्रू का वरं आले !

हिरा—( सस्मित मुखाने ) हे अश्रू दुःखाचे नसून अपूर्व सुखाचे आहेत. ते तसेच वाहूं देत !, अंतरींच्या प्रिय मूर्तीवर प्रीतीचा अभिषेक चालला आहे. या पाझरणाऱ्या अश्रूंना त्यागाचा दिव्य प्रकाश मिळून त्यांत आपल्या नव्या जीवनाचं प्रतिबिंब उमटलं आहे. प्रीतीच्या ज्योती नेत्रांत पाजळून आणि हृदयांतल्या तुमच्या हाकेला ओ देत एकेक दिवस मी धीरानं कंठीन.

वाल्या—बहिरूचा नीट सांभाळ कर ! तो जरा अवखळ आहे. माझ्या प्रेमाची ठेव त्याच्या रूपानं मी तुझ्यापाशीं ठेवली आहे. ती जिवापलीकडं जतन कर. देव तुला सुखी ठेवो !

हिरा—( सद्गदित होऊन ) या अमोल आनंदाचा हा सुवर्णक्षण तुमचा वियोग सहन करण्याचं धैर्य मला देत आहे. भेटीच्या सुखापेक्षां हें विरहाचं दुःख मला अधिक प्रिय वाटतं !

वाल्या—जुन्या ओळखीचा आणि जोखमीचा उरलेला पसारा आवरून मी पुढच्या तयारीला लागणार. तरी आतां ही जिवाची खूण ओठीं ठेवून तुझे हे थरथरणारे हात मागं घे—

( १३ )

वाल्या—**निरोप मजला दे आणि सखये, जातो मी आतां !**
हिरा—**तळमळ लागे कोमल ह्रदया प्रेमभरें बघतां ॥ धृ० ॥**

वाल्या—**नकळत नयनीं आशा फुलते**
हिरा—**तोडुनि कधि कां तुटतें नातें**
वाल्या—**हास गडे ! तूं पुन्हा एकदा धीर मना देतां**
हिरा—**नसे जिवा या जगीं विसावा तुझ्याविना नाथा ! ॥१ ॥**

वाल्या—**निर्मळ आहे प्रेम आपुलें**
हिरा—**प्रिय दैवत हें प्रसन्न झालें**
वाल्या—**गालावरचे अश्रू वदती सुंदर भावकथा**
हिरा—**आज मिळाला अमृतघट हा गीत नवें गातां ॥ २ ॥**

( 'जातो मी आतां'—असें म्हणत वाल्या जातो. त्यच्याकडे दृष्टि लावून हिरा पहात राहते. )

---

अंक २ रा समाप्त

# अंक ३ रा

## प्रवेश पहिला

( स्थळ—अरण्य, तारा प्रवेश करते व बावरलेल्या नजरेनं सभोंवार पहाते )

(१४)

तारा—रमवी आशा मना, पुन्हा ही
हुरहुर लागे चाहुल घेतां भूल पडे लोचनां ॥ ध्रु० ॥

बावरली कां वनबाला ही
जोडीवांचुनि गोडी नाहीं
आठवुनी त्या प्रेमळ वचना येत सखी मलिना ॥ १ ॥

पदरीं पडतां पहिला वाटा
नकळत हृदयीं रुतला काटा
वेडी माया छेडित वीणा साहुनि ती यातना ॥ २ ॥

( भीत भीत हलक्या पावलांनीं पुन्हा चाहूल घेते. )

हा काळू गेला तो गेलाच ! काय पण लुच्चा माणूस आहे. त्याच्या लाघवी भाषणाला फसून मी या जंगलांत अशी एकटी मुठींत जीव घेऊन राहिलें. मला चांगलीच अद्दल घडली. चोरट्या प्रीतीच्या काटेरी खेळानं माझा कोवळा जीव चुरमळून गेला. माझंच नशीब खोटं ! दुसऱ्याला नांव ठेऊन आपलं नांव उजळ होईल कां ? इथून आतां काढतां पाय घ्यावा हें बरं ! एकादा लांडगोबा दबा धरून जवळच बसलेला असायचा—( तारवटलेला निळू येतो.)

निळू—ए गांवभवानी ! कुठं चाललीस ? मला चटक लावून इकडं सटकलीस काय—

तारा—( बावरून ) या झाडीच्या पलीकडं माझ्या मायेची एक मावशी राहते, ती फार आजारी आहे असा निरोप आला. तिला भेटावं म्हणून मी लगबगीनें निघालें होतें.

निळू—ही लंगडी सबब इथं चालायची नाही. थांव, त्या मावशीच्या ऐवजीं तुलाच एक गोळी चांगली उगाळून देतो. तूं काय मला सांवापुढचा समजलीस होय ?

तारा—( लाडानें हसत ) असं काय वरं निळू ! तूं माझा आहेस ना ! ( त्याच्या जवळ जाते. )

निळू—दूर हो आधी ! तूं माझी नाहीस. तुझं सारं कारस्थान मला पुरतं समजून आलंय. कावळ्याच्या घरट्यांत गुपचूप अंडीं घालून दूरच्या फांदीवर कुहूकुहू करीत मुरकणाऱ्या त्या कपटी कोकिळेचा कावा केव्हांतरी कळनोच. माझ्यापेक्षां त्या काळविटाचा जिव्हाळा तुला जास्त वाटला अं !

तारा—[लाडी गोडी लावीत] तसं नव्हे रे निळू ! कसं सांगूं म्हणजे तुझी खात्री पटेल. तोच निर्लज्जपणानं माझ्या भोंवती घुटमळूं लागला, त्याला मी काय करूं ! तूं मला वचन दिल्याप्रमाणं भेटायला येशील म्हणून तुझी मी किती वाट पाहिली. असं काय करतोस रे ! पहिल्याप्रमाणंच माझी माया तुझ्यावर आहे. माझ्याशीं तूं सरळपणानं बोलत सुद्धा नाहीस. हीच कां माझ्या प्रेमाची तूं पारख केलीस ?

निळू—ती विषाची पारख ठरली ! माझ्यापुढं त्या प्रेमाचं पुन्हा नांव काढूं नकोस—

तारा—तुझ्या मनांत हा भलता संशय शिरलाय. तो आतां तूं काढून टाक. एकदा म्हटलं ना ! मी तुझीच आहे—

निळू—पण मी तुझा होणं आतां अशक्य आहे. या प्रेमाच्या नाटकानं मी असा फिरून फसणार नाही. डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराला पाठीवरचा दंडगा दिसत नसतो.

30898 पा. वा. 2988 3-7-57

तारा—मी तुला नको आहे ना ! मग पुन्हा पुन्हा माझ्या मागं कां लागतोस ?

निळू— [डोळे फिरवून] माझा गळा गुंतविणाऱ्या या प्रेमाचा मी सूड घेणार आहे. कुठं आहे तो तुझा काळ्या ?

तारा—मला काय विचारतोस ? तूंच त्याला शोधून पहा ! माझ्या वाटेंतून तूं बाजूला हो. तुझ्या नादीं लागण्यांत अर्थ नाही.

निळू—मी तुला माझ्या हातची जाऊं देणार नाही. खोटं प्रेम करून माझ्या जिवाला जहरी झुरणी लावलीस, त्याचं हें प्रायश्चित्त भोग आतां ! [खंजीर उपसतो.]

तारा—चोर तो चोर आणि वर शिरजोर ! पुढं काय होईल याचा विचार केला आहेस कां ? (घाबरून मागें सरते. )

निळू—सारा विचार आधींच करून ठेवलाय मी. तुझ्या प्रीतीचा आणि या जगाचा मला अगदी वीट आलाय. जिथं माझी सुखस्वप्नं विरघळून गेलीं, तिथं हें काळं तोंड घेऊन मी राहणार नाही. तुझ्या नांवानं मी संन्यास घेणार आहे, पण त्या आधीं गुलगुल गोष्टी बोलून माझ्या काळजाला चावा घेणाऱ्या या उनाड मैनेची मानच मुरगळून टाकतो. काय समजलीस तूं ? तुझ्या रक्तानं लाल झालेल्या हातानं त्या तुझ्या साथीदारालाहि चांगलाच रंगवतो. (त्वेषानें तिच्याशीं लगट करून तिच्यावर खंजीर रोखतो. ती भिऊन किंचाळते. अकस्मात् वाल्या कोळी येऊन त्याला मागें खेचतो. )

वाल्या—कोण, निळू ! एका अनाथ स्त्रीवर हात टाकायला तुला शरम नाही वाटत ? फिर मागं !

निळू—( चकित होऊन ) कोण, वाल्या कोळी—चोरांचा पुढारी—आमच्या टोळीचा नाईक कां हें मला सांगत आहे ? मी स्वप्नांत तर नाही ना—पूर्वेचा सूर्य पश्चिमेकडं उगवला काय ?

वाल्या—होय ! तोच वाल्या, अट्टल दरोडेखोर आणि वाटमारांचा काळ तुला हें सांगत आहे. नीट डोळे उघडून माझ्याकडे पहा !

निळू—या वेळीं मी तुला ओळखत नाही. मला उपदेश करणारा तूं कोण ?

वाल्या—मी तुला तसं करूं देणार नाही. तिचा जीव तूं काय म्हणून घेतोस ?

निळू—आपल्या विषारी प्रेमानं तिनं माझा जीव घेतला, त्याचा मोबदला तिला मी देत आहे.

वाल्या—हा केवळ वेडेपणा आहे. जुलमानं प्रेम मिळत नसतं—तें हळूवार प्रेमानंच मिळवावं लागतं. मुंगी होऊन साखर खाण्यांत गोडी असते. तूं आपलं अविचारी मन आवरून घे. तुझ्या या मावळत्या नायकाचा तुला हा अखेरचा हुकूम आहे.

निळू—तो मी मुळीच मानणार नाही.

वाल्या—तुला तो मानावाच लागेल ! ( तारेकडे वळून ) बाई ! मी इथं आहे तोंवर तूं आपल्या वाटेनं निघून जा ! प्रेमाची वाट फुलांपेक्षां काट्यांनींच अधिक भरलेली असते. प्रणयाच्या पहिल्यावहिल्या नवलाईनं तरारणाऱ्या तरुण जीवाला त्याचं भान नसतं. पण एकादा अचानक फटका बसून तो भरारी मारणारा भोळा जीव धरणीवर कोसळतांच, त्याच तीक्ष्ण काट्यांनीं त्याचं हृदय रक्तबंबाळ होऊन जातं, तेव्हांच तो शुद्धीवर येतो. वेळ निघून गेल्यावर तळमळत राहण्याखेरीज दुसरा मार्ग उरत नाही. आंधळेपणानं आधीं गळ्यांत गळा घालायचा आणि मग एकमेकांचा गळा दाबायला टपून बसायचं, याला काय माणुसकी म्हणतात ? अशा रीतीनं प्रेमाचा खेळ मांडण्यांत दोघांनाहि धोका असतो. असो, तूं जा आतां.

तारा—( कृतज्ञतेनें ) तुम्हीं आज मला जीवदान दिलंत. तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. ( जाते. )

निळू—( चिडून ) तूं आमचा पुढारी म्हणून मी तुझी गय केली, पण तूं तर माझ्याच मुळावर आलास. ही माझी शिकार आहे. तिचा निकाल मी माझ्या मर्जीप्रमाणं लावीन. तूं मधें पडूं नकोस ! ( तिला धरायला धावतो. वाल्या त्याला रोखतो. )

वाल्या—एका असहाय्य अबलेला गांठून तिच्यावर बळजोरी करणं हें माणुसकीला लांछन आणणारं कृत्य आहे. ही काय प्रेम करण्याची रीत झाली ? हा प्रीतीवरचा अन्याय आणि माणुसकीची विटंबना मी उघडया डोळ्यांनी कदापि सहन करणार नाही.

निळू—तूं मुकाटयानं इथून चालता हो. माझा राग मला आवरणार नाही. सोसाटयाच्या वाऱ्यानं रानांतल्या ठिणगीचा वणवा व्हायला वेळ लागत नाही. तुझ्यासारख्या उलटया काळजाच्या गळेकापूनं मला नीतीचे घुटके पाजूं नयेत.

वाल्या--हा अतिप्रसंग होत आहे. माझ्या शब्दाला मान देऊन तूं हा आततायीपणा सोडून दे.

निळू—ही नसती पंचाईत तुला करण्याचं कारण नाही. तूं दूर होत नाहीस ? ( वाल्या मानेनें 'नाही' असें सुचवितो. निळू खंजीर उगारून ) तर मग घे हे बक्षीस !

वाल्या—( भेदक दृष्टीनें पहात ) दुसऱ्यांचे जीव घेऊन मी आजवर जगत आलों. पण आतां दुसऱ्यांना जगविण्यासाठीं माझा जीव मी अर्पण करणार आहे. असा उभा कां राहिलास ? चल ये, बघतोस काय ? ( आपली छाती पुढें करून ) आपलं हत्यार तूं खुशाल माझ्यावर चालीव, आणि तुझ्या माथ्यांतला भडकलेला अंगार माझ्या हृदयांमधून उसळणाऱ्या लाल कारंज्यानं विझवून टाक ! चल ये, मी तयार आहे. ( निळू खंजीर उगारून पुढें पाऊल टाकतो पण दुसऱ्याच क्षणीं गहिवरून वाल्याचे पाय धरतो. वाल्या त्याला प्रेमानें उठवितो. )

निळू—( पश्चात्तापानें ) माझी चूक मला कळून आली. आज तूं माझ्या डोळ्यांत अंजन घातलेंस. मी तुला टाकून बोललों, याची मला तूं क्षमा कर !

वाल्या—मी तुला क्षमा केव्हांच केली आहे. माझी टोळी मी मोडून टाकली असून तुलाहि मोकळा करीत आहे. आजपासून तूं स्वतंत्र झालास ! झाल्या गोष्टींचा खेद न करतां आणि स्वताच्या सुखासाठीं दुसऱ्यांना दुःख न देतां, यापुढें तूं चांगल्या मार्गानें वागण्याचा प्रयत्न कर ! मला थांबायला सवड नाही. देव तुला चांगली बुद्धी देवो ! मी जातो आतां. ( जातो. )

निळू—तुझे हे बहुमोल बोल माझ्या कानांत नेहमी घुमत राहतील !

( जातो. )

---

## प्रवेश दुसरा

( स्थळ—वन, पूर्वस्थळीं नारद भजन करीत उभा आहे. )

( १५ )

नारद— दीन जना दावि दया
धाव पाव भगवंता ! ॥ धृ० ॥

तळमळते मानवता
ये आतां गुणवंता !
जगतीं या पतितांना
कोणि नसे त्राता ॥ १ ॥

ब्रीद तुझें सार्थ करी
आनंदें भुवन भरी
सुख लाभो सकलांना
प्रेमळ तूं माता ॥ २ ॥

( खालीं मान घालून मंद गतीनें वाल्या येतो. ) ये, असा जवळ ये ! दूर कां उभा राहिलास ? इतकं मनाला लावून घेऊं नकोस

वाल्या—आपल्या जवळ येण्याची माझी योग्यता नाही. लोखंडाच्या तुकड्यानं परिसाची बरोबरी करूं नये.

नारद—परिसाची भेट घडत असतांना लोखंडानं लाजून कसं चालेल ? तोच त्याच्या भाग्याचा सुवर्णक्षण ! कामधेनु घरीं चालून आल्यावर तिच्या चाऱ्यापाण्याची काळजी कोणी करील कां ?

वाल्या—( खालीं मान घालून ) माझं पापी मन मला खात आहे. माझ्या हातून अक्षम्य अपराध घडले आहेत. 'माणूस' या नांवाला मी कलंक आहे.

नारद—तूं कसाहि असलास तरी मला जवळचा वाटतोस. चुका सर्वांच्या हातून होत असतात. चुकणं हा मनुष्यस्वभाव आहे. पण एकदा झालेली चूक पुन्हा न करणं, हें माणूस असल्याचं खरं लक्षण होय. बरं, तूं गेला होतास त्याचं काय झालं ? तुझ्या पातकांचा भार हलका करायला तुझ्या प्रेमाचीं माणसं तयार आहेत ना !

वाल्या—माझी समूळ निराशा झाली. मायाममतेचीं स्वप्नं पार वितळून गेलीं. माझा सारा अहंकार मातीमोल ठरला. माझ्या डोळ्यावरची झापड दूर झाली—

नारद—तूं लवकर सावध झालास याचं मला समाधान वाटतं. कारण त्यांत तुझं कल्याण आहे. देवानं सोन्यासारखा नरदेह दिला तो काय चिखलांत लोळण्यासाठीं ? माणसाचा देव होतो तसा त्याचा पशूही बनतो. हें सारं त्याच्या कृतीवर अवलंबून आहे.

वाल्या—माझं मन आतां पुरतं पालटून गेलं आहे. माझ्या पूर्वायुष्याची मला खरोखर खंत वाटते. आपण मला खरोखर देव भेटलांत. तुम्हीच

माझा उद्धार करा ! हे पाय सोडून मी कुठंही जाणार नाही. ( त्याच्या पायांवर डोके ठेवतो. नारद त्याला प्रेमानें उठवितो. )

नारद—ज्याचा उद्धार त्यानंच करून घ्यायचा असतो. बांधलेली शिदोरी अन् सांगितलेली अक्कल किती पुरणार !

वाल्या—मला असं अधान्तरीं लोंबकळत ठेवूं नका. माझ्या मनाची तळमळ शांत होईल अशी शिकवण मला द्या !

नारद—तुझ्या मनाचा पूर्ण निश्चय झाला आहे ना ! नाहीतर पुन्हा पहिल्या वळणावर जाशील. कुत्र्याचं शेपूट नळींत आहे तोंवर सरळ असतं, पण पुन्हा वाकडं व्हायला वेळ लागत नाही.

वाल्या—कांही झालं तरी माझं मन आतां फिरायचं नाही. एकदा दारांतून हुसकून दिलेलं कुत्रं पुन्हा तिकडं वळत नाही. मग मी तर माणूस आहे !

नारद—माणुसकी सोडलीस म्हणून तर असा गटंगळ्या खात राहिलास. माणूस हाच स्वताचा शत्रु आणि मित्र आहे.

वाल्या—कृतकर्माचा मला आतां फार खेद होतो. माझ्या नांवाला लागलेला काळिमा दूर करण्याचा उपाय आपण मला सांगा. त्यासाठीं वाटेल तो देहदंड सोसायला मी तयार आहे.

नारद—पश्चात्ताप हेंच खरं प्रायश्चित्त ! आत्मशुद्धीचं तेंच एक उत्तम साधन आहे. सुविचारांच्या किरणांनीं जीवनावर चढलेली काजळी झडून जाते. शिक्षेचं भय मनुष्याला तात्पुरतं सावध करूं शकतं. स्वताला सुधारण्याचा दृढ संकल्प मनाशीं करून त्याप्रमाणं अखंड आचरण ठेवण्याचं व्रत घेतलं पाहिजे. सुधारणेची खरी कळ मानवी मनांतच असते. त्याठिकाणीं बाहेरचीं साधनं अपुरीं पडतात.

वाल्या—आपल्या शब्दाबाहेर मी जाणार नाही. माझं जीवन निर्मळ करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. माझे पूर्वीचे दोष विसरून जग माझ्याकडे आपुलकीनं पाहील कां ?

नारद—जग हें एकाद्या अल्लड बालकासारखं आहे. त्याला रुसायला आणि हसायला फार वेळ लागत नाही. कमळ चिखलांत उगवतं म्हणून रसिक कांही त्याचा अनादर करीत नाहीत. सत्कृतीचा सुगंध आणि सद्गुणांचा प्रकाश तूं आपल्या जीवनांत भरून टाक. सत्यनिष्ठा आणि सदाचार या इहलोकींच्या दोन दिव्य संजीवनी आहेत. त्यांनींच मनुष्याचा खरा कायाकल्प होतो ! माझा उपदेश जागरूकपणानं उराशीं बाळगशील ना ! नाहीतर, ‘ नळी फुंकिली सोनारें अन् इकडून तिकडे गेलें वारें, ’ असं होईल. गळक्या भांड्यांत ओतलेली अमृताची धार मातीला मिळते. केवळ मी सांगतो म्हणून तूं या मार्गांत पडलास असं होऊं नये. मी कांही तुझ्यावर बळजबरी करीत नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणं वागायला तूं स्वतंत्र आहेस.

वाल्या—असं बोलून मला पुन्हा कां हिणवितां ? माझं हृदय मी आपल्यापुढं खुलं केलं आहे. आपण मला अभय द्यावं. मी आपल्या चरणीं शरण आलों आहे. शरणागताला सज्जन दूर लोटीत नाहीत !

नारद—‘ मी कोण ’ याची तीव्र जाणीव उत्पन्न होणं हीच खरी माणुसकी अंगीं आल्याची खूण आहे, आणि तीच प्रगतीची अढळ पताका—

वाल्या—( प्रसन्न चित्तानं ) तुम्ही मला दिव्य दृष्टी दिलीत. हळू हळू नवी सृष्टी माझ्या डोळ्यांसमोर प्रगट होऊं लागली आहे.

नारद—कशाचीहि चिंता न करतां एकनिष्ठेनं भगवंताचं चिंतन करीत रहा. तुझ्या हातून अलौकिक कार्य व्हावं, अशी विधीची योजना आहे. त्यासाठीं मी या ठिकाणीं मुद्दाम फेरी घातली.

वाल्या—( नम्रतेनें ) तुमच्या कृपाप्रसादानं आज या फत्तराची सुवर्णमूर्ती झाली. या चरणांच्या पुण्याईनं माझा पुनर्जन्म झाला. हरवलेला ठेवा मला परत मिळाला.

नारद—माझे बोल नीट श्रवण कर ! दीन दुबळ्यांच्या रक्षणासाठीं आणि निराश झालेल्या जीवांना सुखाची छाया देण्यासाठीं श्री भगवान्, रामरूपानं या

भूतलावर सत्वर अवतीर्ण होणार आहेत. त्यांचं पुण्यचरित्र लिहिण्याचा–जगाचा पहिला कवि होण्याचा, पहिला बहुमान तुला मिळणार आहे स्वताच्या अभ्युदयाची आणि इतरांच्या कल्याणाची गुरुकिल्ली मी तुझ्या स्वाधीन करीत आहे. तिचा सदुपयोग कर ! ही माळ घे, या चिपळया घे, आणि मी सांगतो त्याप्रमाणं हरिनामाचा जप कर. हं म्हण ! राम ( वाल्या 'मरा' म्हणतो ) राम–( पुन्हा 'मरा' म्हणतो) राम—( तरी 'मरा' च म्हणतो) ठीक आहे. 'मरा' च म्हण, पण 'रा' वर जरा जास्त जोर दे. ( तसें म्हणतो व त्याला प्रणाम करतो. ) तूं कांही चिंता करूं नकोस ! माझा मंगल आशीर्वाद तुझ्या मस्तकीं आहे. (त्याच्या मस्तकावर आपला हात ठेवतो. ) वाल्या कोळ्याचा वाल्मिकी महर्षि होईल ! तथापि आत्मशुद्धीसाठीं कांही काळ तुला तप करावं लागेल. अग्नींत पडल्यानं सोन्याचा कस अधिक वाढतो. या ठिकाणीं आसन घालून तूं ईश्वर चिंतनांत निमग्न हो. मी पुन्हा येईन (वाल्या डोळे मिटून नम्र होतो. नारद जातो. )

वाल्या—( डोळे उघडून ) हे दयामय परमेश्वरा, तुझी लीला अगाध आहे. तुझ्या चिरंतन कृपेचं कवच या पतिताला मिळेल का !

(१६)

**ये सदया प्रभुराया !**
**पदसेवा ही तव देवा**
**नित्य सुखाची काया ॥ धृ० ॥**

**प्राणसखा तूं दीन जिवांचा**
**अक्षय ठेवा मोक्षधनाचा**
**बंध निवारी घननीळा !**
**मानवला छंद मला**
**गोड तुझे गुण गाया ॥ १ ॥**

भानहरी तव पावन लीला
दावी करुणा या शरणाला
नाम तुझें मंगल घेतां
दे हाता मज आतां
तुजविण हें जीवन वांया ॥२॥

[ नारदानं सांगितल्याप्रमाणं नामस्मरणांत रंगून जातो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ—वाल्याचें घर, अंगणांत विचारमग्न स्थितींत हिरा उभी आहे. ]

हिरा—धीरानं त्यांना निरोप देऊन मी घरीं परत आलें खरी, पण त्यांच्या भेटीसाठीं माझं मन कसं अधीर झालं आहे. त्यांच्याविणं सुनं भासणाऱ्या या घरांत माझ्या मनाला करमत नाही. आमच्या प्रीतीचे पडसाद या भयाण वाटणाऱ्या जागेंत आहेत. ते सारखे कानावर पडून माझा जीव अधिकच व्याकुळ होतो एका हिरव्यागार वृक्षावर दोन प्रेमवेडीं पाखरं रहात होतीं. त्या चिमुकल्या घरट्यांत नवसाच्या नव्या आनंदाचा किरण नाचूं लागला. मनांतल्या प्रीतीला आणि वनांतल्या नवतीला सोनेरी मोहोर आला. पण परस्पराला हळुवार साद देत असतांना, सुखाची नवी सृष्टी पहायला जिवाचा सोबती अचानक दूर निघून गेला. आशेचा ठेवा हृदयाशीं धरून ती भोळी प्रीती आपला जीव सारखी पाखडीत राहिली आहे. माझी आठवण त्यांना राहील का मला भेटायला ते इथं पुन्हा परत येतील ना ! पण अशी शंका तरी मला कां वाटावी ? [ बहिरू येतो. ]

बहिरू—[आश्चर्य करीत] आई, तूं कुणाशीं बोलत आहेस ? इथं तर दुसरं कोणी दिसत नाही. माझे बाबा कुठं गेले ?

हिरा—बाळ, असा इकडं ये ! तूंच आतां माझ्या जिवाचा आधार आहेस.

बहिरू—अजून बाबा कसे आले नाहीत ! तूं बोलत कां नाहींस--तुला ते कांही बोलले कां ?

हिरा—मला ते कशाला बोलतील !

बहिरू—मग तूं त्यांना बोललीस होय ! म्हणून तुझ्यावर ते रागावले असतील.

हिरा—मी त्यांना कांही म्हणालें नाही आणि तेहि माझ्यावर रागावले नाहीत.

बहिरू—मग बाबा तसेच कसे निघून गेले ? आई, सांग ना ! अशानं मी तुझ्याशीं बोलणार नाही, जा ! [ रुसतो. हिरा त्याला आपल्या जवळ घेते. ]

हिरा—बाळ, आतां असं रुसायचं नाही. मी सांगेन तसं वागशील ना !

बहिरू—होय ! अगदी तूं सांगशील तसा मी वागेन. [ क्षणभर थांबून ] पण आई, हें बघ किनई माझे बाबा तुझ्यावर रागावले नसून ते माझ्यावर रागावले आहेत. म्हणून ते घरीं परतले नाहीत.

हिरा—काय केलंस तूं ?

बहिरू—नवा पोषाख तूं मला दिला नाहीस. मग मी बाबांच्या जवळ हट्ट धरला. पण त्यांनी माझं बोलणं ऐकलं नहीं, आणि मला ते रागानं बोलूं लागले. जुने कपडे घालून फिरायची मला लाज वाटते. आई, हें बाबांना कां कळूं नये ! त्यावेळीं तूं तिथं नव्हतीस. असं केल्यावर कुणाला राग येणार नाही ? मी पण त्यांना उलटून कांहीतरी बोललों. माझे मित्र माझी वाट पहात होते, म्हणून मी तसाच मागं फिरलों. मी हट्ट केला आणि त्रास दिला, म्हणून बाबा परत आले नाहीत. आई ! त्या गोष्टीचं मला आतां फार वाईट वाटतं. मी फिरून असं कधीच करणार नाही.

हिरा—( त्याचा हात धरून ) तूं काळजी करूं नको. चल, आपण घरांत जाऊं या !

बहिरू—माझे बाबा आले तरच मी घरांत पाऊल ठेवीन. ते खरंच माझ्यावर रागावून गेले आहेत. थांब, मीच जाऊन त्यांना परत घेऊन येतो.

हिरा—तूं एकटा कसा जाशील ! तुला वाट सापडायची नाही.

बहिरू—तर मग तूं चल माझ्याबरोबर ! ( तिचा हात धरून तिला ओढूं लागतो. ) अशी काय ग करतेस ? चल ना ! तूं आली नाहीस तर मीच आपला एकटा जातो.

( तिचा धरलेला हात सोडून देतो. )

हिरा—बहिरू, अशी घायकूत करूं नकोस.

बहिरू—तूं येत नाहीस अन् मलाही जाऊं देत नाहीस. हें ग काय आई !

हिरा—ते मला सांगून गेले आहेत.

बहिरू—तूं खोटं सांगतेस. हें मात्र मी तुझं ऐकणार नाही. माझ्या बाबांना परत आणीन. आणि मगच तुला हें तोंड दाखवीन. तूं रहा आपली तुझ्या घरांत. ( आईच्या तोंडाकडे बघतो. तिचे डोळे भरून येतात. ) आई ! तुझ्या डोळ्यांत पाणी कां आलं ? बाबा रागानं निघून गेले आणि तुला सोडून मीहि त्यांच्याकडे चाललों म्हणून तुला वाईट वाटलं होय ! ( ती त्याला प्रेमानें पोटाशीं धरते. बहिरू तिचे अश्रू पुसतो. )

हिरा—( त्याला गोंजारीत ) माझा बाळ तो ! बहिरू, तूं किती चांगला आहेस !

बहिरू—आई, तुला खरं सांगूं कां मी ? इथं रहावं असं मला वाटत नाही. तूं देखील या ओसाड जागेंत राहूं नकोस. माझे बाबा कुठं असतील ग ! आपण दोघं मिळून त्यांना भेटायला जाऊं या. तूं माझ्यावर रागावलीस होय ? आई, माझ्या चुकीची तूं मला क्षमा करशील ना ! तूं माझी प्रेमळ आई आहेस—

आई खरी दया ही
हृदयीं भरोनि राही ॥ ध्रु० ॥

हा देव आवडीचा
या सान बालकाचा
व्याकूळ जीव झाला
तों गोड बोल आला ॥ १ ॥

सुकुमार फूल हासे
माया अमोल भासे
घरट्यांतल्या पिलानें
हाकारिलें सुखानें ॥ २ ॥

गावी नवी कहाणी
कांही म्हणोत कोणी
आधार एक माता
दावील वाट आतां ॥ ३ ॥

( तिचा हात धरून तिला ओढीत. ) तुम्हा पुन्हा मागं वळून काय पहा-तेस ? तूं येत नाहीस का ?

हिरा—वचनानं मी तिकडं बांधलें गेली आहे. त्यांच्या भेटीला मी आतांच कशी येऊं ? पण तुझं मन मोडणं माझ्या जिवावर येतं. तूं तर माझा प्राण आहेस. फुलांच्या पाकळ्यांत लतेला तिचीं गोड स्वप्नं दिसतात. चल चाळ, जिकडं वासरू तिकडं गाय !

( बहिरूच्या मागून जाते. )

# प्रवेश चवथा

( विचारांत गुंग झालेला इंद्र प्रवेश करतो )

इंद्र—नारद मुनीच्या बोलण्याचा मला चमत्कार वाटतो. बरेच दिवसांनी त्यांची भेट झाली म्हणून मनाला आनंद वाटला, पण दुसऱ्या क्षणीं त्यांचे ते बोचक शब्द आठवून मन उदास होतं. प्रत्यक्ष भगवंतांनी अवतार घेण्याची पाळी यावी, असं पृथ्वीवरती कसलं अरिष्ट कोसळलं आहे? नारद खोटं बोलतील असं वाटत नाही. प्रभूंचे ते लाडके आहेत आणि त्यांची योग्यताहि तशीच मोठी आहे. आपल्या बरोबर येऊं नको, असं ते मला कां म्हणाले? माझं विलासी वर्तन त्यांना आवडलं नाही, हें त्यांच्या उद्गारांवरून माझ्या ध्यानीं आलं. पृथ्वीच्या संकटांत स्वर्गानं तिला मदतीचा हात देणें, हें केव्हाहि योग्यच आहे. झाल्या चुकीची दुरुस्ती वेळींच करण्यांत मोठेपणाबरोबर शहाणपणाहि दिसून येतो. नारदांना येथून जाऊन बराच वेळ झाला. ते मला नको म्हणाले तरी त्यांच्याबरोबर मी जायला हवं होतं. आतां अधिक वेळ न गमावतां आपणही खालीं उतरून पृथ्वीचं दुःख समजून घ्यावं. [ नारद प्रवेश करतो. ]

नारद—[ विस्मयपूर्वक ] महेंद्रा! असा एकटा कुठं निघालास—तुझी चर्या अशी मलूल कां दिसते?

इंद्र—मला भेटून तुम्ही येथून गेल्यापासून माझ्या मनाला बरं वाटेना मानवलोकांत जाऊन तिथली सारी परिस्थिति समक्ष पाहून यावं, असं मी मनाशीं ठरवलं आणि पाय उचलला, तोंच तुम्ही पुन्हा मला भेटलांत—पृथ्वी वरची तुमची वारी सफल झाली ना! हवा असलेला माणूस तुम्हांला मिळाला कां?

नारद—[ अभिमानानें ] होय! तसा माणूस मला सापडला हें तुला सांगायला मला मोठा आनंद होतो. हातीं घेतलेल्या कामांत इतक्या लवकर

यश मिळेल असं मला आधी वाटलं नव्हतं. कावळा दसायला अन् डहाळी मोडायला एकच गांठ पडली.

इंद्र—तो कसा काय आहे—त्याचं नांव काय ?

नारद—त्याला वाल्या कोळी म्हणतात. अट्टल लुटारूंचा राजा अन् मुर्दाड मनाचा तो एक माणूस आहे—नव्हे होता ! दुसऱ्यांना दुःख देत आणि स्वताहि दुःखाचे घोट घेत तो कसातरी जगत होता. मला पाहतांच त्यानं आपला विक्राळ पंजा माझ्यावर उगारला. चुकून वाघाच्या गुहेंत शिरलेल्या हरिणाप्रमाणं माझी अवस्था झाली. माझ्या आयुष्याची दोरीच बळकट म्हणून मी वाचलों आणि त्यालाहि वाचविला !

इंद्र—अशा आसुरी मानवाचा तुम्हांला उपयोग काय होणार ? पाठीला दोन पिसं चिकटवून डोमकावळ्याचा का मोर होतो ! सापाला हार समजून तुम्ही तो आपल्या गळयांत घालीत आहां. पहा बरं ! मोत्याच्या ऐवजीं नुसता शिंपलाच पदरांत पडेल. जातिवंत चोर कधी पहिला कवि होईल काय ?

नारद—तुला त्याची काळजी नको ! मी सारी कळ फिरवून ठेवली आहे. त्याच्या वृत्तींत फिरून तसा पालट पडणार नाही !

इंद्र—तुमची योजना अचूक असणार हें मी जाणून आहे. परंतु एकदा मनाला जडलेली संवय सहसा सुटत नाही. कितीहि मागं वळविण्याचा अट्टाहास केला तरी पाणी उतरतीकडंच धाव घेतं.

नारद—पण हें पाणी अगदी वेगळं आहे, आणि नियमाला अपवाद हा असतोच. आयुष्यांत असा एकादा प्रसंग येतो कीं, त्यानं काट्याचं फूल बनतं-विषाचं अमृत होतं !

इंद्र—पण त्या अमृताचं पुन्हा विष झालं तर--

नारद—ईश्वरी इच्छेचं पाठबळ असल्यावर तसा उलटा प्रकार होणार

नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. अधोगतीचा तळ हा भावी उन्नतीचा कळस दाखवितो ! अपयशाच्या वाटेवरून यशाचीं पावलं उमटूं लागतात आणि कोंदाटलेल्या अंधारांतून प्रकाशाची हसरी मूर्ती प्रगट होते. नियं वाल्याचा वंद्य वाल्मिकी आणि जगाचा पहिला कवि व्हावा, असा ईश्वरी संकेत आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून मी त्याला तपाचं साधन सांगून ठेवलं आहे. दैवी कृपेचं छत्र त्याच्या मस्तकावर आहे.

इंद्र—( संशयी वृत्तीनें ) पण मनांत नसतां एकाद्याला मारून मुटकून संन्यासी बनविण्यांत हशील काय ? गुळगुळीत दगडाला मुद्दाम पैलू पाडून त्याचं रत्न होत नसतं.

नारद—( सात्विक संतापानें ) तुला तें कळायचं नाही. कावीळ झालेल्या रोग्याला सगळंच पिवळं दिसतं ! डौलानं वर पहात डोलणाऱ्या माडाला पाया—खालच्या हिरवळीचं कौतुक कसं वाटेल ? परंतु फोफावणाऱ्या वादळाच्या लाटेनं त्याचं तें मीपणानं ताठरलेलं मस्तक छिन्नविछिन्न होऊन खालीं झुकूं लागतं आणि त्यानं तुच्छ मानलेली ती हिरवळच त्याला आपल्या कुशीचा आधार देते. कालचं चित्र आज पालटतं. सृष्टीचा तो सहजधर्म आहे. अवघ्या विश्वाला गवसणी घालणारी विराट कालशक्ति, क्रांतीची पताका फडकावीत नव्या युगाचे ललकार घरींदारीं घुमवीत राहिली आहे. ‘ मी मोठा, तो लहान’ हें विषमतेचं पालुपद—मानवतेचं नवगीत नव्या सुरांनीं आळवीत प्रगट होणाऱ्या समतेच्या देवतेला रुचेल काय ? बदलत्या जगाच्या स्वरांत आपला सूर मिसळून उगवत्या उषेचं स्वागत करायला—जीवनाचा सजीव देव—अनंत मुखांनीं सर्वांना सारखा पुकारीत आहे. तिकडं लक्ष दे ! सुवर्ण किरणांनीं कमलाचं हृदय प्रफुल्लित करणाऱ्या रमणीय अरुणाला पाहून वटवाघळाचा जीव कासावीस होतो, त्याला इलाज नाही. तुझी मुद्रा अशी पालटली का ! काय आहे तुझ्या मनांत ?

(१८)

राग तुला कां आला, सखया
ओळखुनी ती खूण जिवाची
साधुनि घे स्वहिताला ॥ धृ० ॥

क्रांतीचा वाजे डंका
दिपवित नयनां दिव्य पताका
कायापालट करित जगाचा
सूर्य नवा हा उगवला ॥ १ ॥

इंद्र—( नाखुषीनं ) तुमचा हेतु माझ्या लक्षांत आला. तथापि त्याची कसोटी पाहूनच तुमच्या म्हणण्याला मी मान डोलवीन.

नारद—जशी तुझी इच्छा ! ( जातो. )

इंद्र—ही माझ्याच परीक्षेची वेळ आहे. यांतून कांहीतरी मार्ग काढला पाहिजे. ( स्वताशीं विचार करीत ) चोराची परीक्षा घ्यायला चोरट्या सारखंच वागावं लागतं. काट्यानंच काटा काढून टाकावा हेंच चांगलं. तर आतां असंच करावं ! कोण आहे रे तिकडं ? ( प्रतिहारी येतो. )

प्रतिहारी—( प्रणाम करून ) आज्ञा महाराज !

इंद्र—असाच जा आणि त्या रंभेला इकडं पाठवून दे !

( प्रतिहारी जातो. रंभा प्रवेश करते. )

रंभा—( वंदन करीत ) महाराजांच्या सेवेला ही दासी सादर आहे.

इंद्र—एका खाजगी कामांत मला तुझं साहाय्य हवं आहे.

रंभा—काय ती आज्ञा व्हावी.

इंद्र—भूलोकावर वाल्या कोळी नांवाचा एक पुंड परमार्थाची पेठ लुट-ण्यास सरसावला आहे. त्याला तसं करूं दिल्यानं भाविकांची दिशाभूल होईल

आणि माझ्या पदरीं कमीपणा येईल. विषारी कळी उमलण्याच्या आंतच खुडून टाकावी. आपल्या मनोहर कलाविलासानं तूं त्याला मोहिनी घालून त्याच्या तपश्चर्येत विघ्न आण, आणि माझ्या हृदयांतलं शल्य दूर कर. तुझ्या गुणाचं चीज मी करीन.

रंभा—हें काम मी आनंदानं पत्करते. या दासीवर महाराजांची कृपादृष्टि असावी ! ( जाते. )

इंद्र—या सोनसळीच्या रुमझुम लहरीनं त्या चोराच्या मनाचं लोणी क्षणांत वितळून जाईल. नारद मुनींनीं त्याला आपल्या पाठीशीं घातल्यामुळं मला जरा संशय वाटतो. तथापि प्रयत्न तरी करून पहावा ! मासळीची चाहूल लागतांच बगळ्याची समाधी खाडकन् उतरते. माझा होरा खरा ठरला तर ठीकच. नाहीतर वारा येईल तशी पाठ फिरवावी. [ जातो. ]

## प्रवेश पांचवा

[ वाल्या कोळी वनांत तपश्चर्या करीत आहे. ' राम राम ' असा मंद नाद त्याच्या मुखांतून निघत असतो. त्याचें सत्व पहायला इंद्राच्या आज्ञेवरून रंभा नाचत प्रवेश करते. ]

[ १९ ]

रंभा—**वनिं या वसंत आला**
**छंद जिवाला सुंदर जडला ॥ धृ० ॥**

**घेत लकेरी गोड कोकिळा**
**प्रीति गुलाबी दावित लीला**
**मधुर वचनीं मोहिनी ही**
**देत सुधेचा प्याला ॥ १ ॥**

हे जोगी, डोळे उघडी
तुजसाठीं मी बनलें वेडी
आपण दोघे प्रेमरंगें
रमवूं या हृदयाला ॥ २ ॥

वाल्या—( हळू डोळे उघडून ) हे सुंदरी, तुझ्या दिव्य रूपानं आणि मधुर गीतानं कुणाचं मन प्रसन्न होणार नाही ! तुझ्या गुणाचं जितकं कौतुक करावं तितकं तें थोडं आहे. ( ती मुरकत त्याच्या नजीक जाते.) तुझ्या स्वर्गीय मोहिनीनं हें सारं वन कसं मंत्रमुग्ध होऊन डोलत आहे ! सौंदर्य हा या सृष्टीचा एक अनमोल अलंकार आहे. सुंदर वस्तु कुणाला आवडणार नाही ! खरोखर तूं फार सुंदर आहेस, पण तुझ्या या सुंदरपणांत विषाचा गुण असल्याचा माझ्या मनाला भास होतो. तुला माझ्याबद्दल आपलेपणा वाटतो, हें माझं सुदैव होय. पण आगंतुक स्नेह संशयास्पद असतो ! दिव्याची ज्योत लांबून मोहक दिसते. ( ती दूर सरते. ) तिच्या जवळ जाण्यांत पतंगाचं मरण असतं ! आपल्या दिमाखानं दुबळ्या पृथ्वीला हिणविण्यासाठीं स्वार्थी स्वर्ग हें मायावी स्वरूप धारण करून प्रगट झाला आहे. या दिखाऊ वैभवाच्या लोभानं कसला लाभ होणार ! तूं सौंदर्याची देवता आहेस. तुला माता समजून मी प्रणाम करतो. ( लज्जित होऊन रंभा निघून जाते. वाल्या पुन्हा ध्यानस्थ होतो. इंद्र येतो. )

इंद्र—हे दैवी मानवा ! ऊठ, डोळे उघड. तुझ्या निर्मळ वृत्तीनं आणि तपानं मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहे.

वाल्या—( हात जोडून) आपल्या दर्शनानं मी आज धन्य झालों.

इंद्र—तुझं मन मी पाहिलं. तुझा भविष्यकाल उज्वल आहे. माझ्या परीक्षेंत तूं उतरलास. तुझी काय इच्छा आहे ?

वाल्या—पृथ्वीचं दुःख दूर होऊन सर्व जीव सुखी असोत !

इंद्र—(त्याच्या मस्तकीं हात ठेवीत) तथास्तु ! ( नारद येतो )

नारद—( स्मित करीत ) देवेंद्रा ! पाहिलास कां हा माझा पहिला कवि ? याच्या शुद्ध झालेल्या वाणीनं भगवंताची नवी लीला जगाला ऐकायला मिळणार आहे.

इंद्र—( ओशाळून ) मुनिश्रेष्ठ ! आपण सर्वसमर्थ आहां. आपल्या अपूर्व पुण्याईनं आणि अजोड करणीनं अंधकाराचा प्रकाश झाला—माझा संदेह मावळला ! ( निळू येतो. )

निळू—माझा पूर्वीचा पुढारी या नव्या स्वरूपांत मला पहावयास मिळाला. हें माझं थोर भाग्य आहे. ( आईचा हात धरून बहिरू येतो. )

बहिरू—( आनंदित होऊन ) आई, ते पहा माझे बाबा ! ( धावत जाऊन त्याला मिठी मारतो. वाल्या त्याला कुरवाळतो. हिरो त्याच्या जवळ जाते. काळू व तारा येतात. )

वाल्या—( हिराकडे पहात ) या सुखाच्या वेळीं तुमची मला भेट झाली. माझं हृदय आनंदानं भरून आलं.

हिरा—( गहिवरून ) आज माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं !

वाल्या—प्रभुरायाच्या कृपेनं हा नवसाचा दिवस माझ्या जीवनांत उगवला.

नारद—मानवजातीच्या मांगल्याची मुहूर्तमेढ या शुभ घटकेला रोविली जात आहे !

वाल्या—( पुढें येऊन ) आपल्या पुण्यप्रभावाचं हें फळ आहे. माझ्या तोंडावरचा काळा बुरखा दूर होऊन माझ्या कर्तव्याचा मार्ग मला दिसूं लागला. जनता जनार्दनानं या गरिबाची सेवा गोड करून घ्यावी. आजपासून माझ्या नव्या तपश्चर्येला प्रारंभ झाला—

[२०]

आनंदें रंगला डोळा, आला हा सोहळा नवा
अन्तरींचा सखा भेटे, तुझें कोडें सुटे जिवा ॥

वाजे मंजुळ ही वीणा, विश्वाच्या मंदिरामधें
जागा हो मानवा ! आतां, दिव्य वाणी पुन्हा वदे ॥

जगाची साधितां सेवा, सुखाचा मार्ग सापडे
मंगल त्या प्रकाशाचा, तजेला जीवना चढे ॥

इंद्र—तुमचं आणि सर्वांचं सदैव कल्याण असो !

नारद—तथास्तु !

' वन्देमातरम् '

( पडदा पडतो. )

अंक ३ रा समाप्त

IRBK-0103386
IRBK-0103386

# शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७२ | १४ | वाऱ्याच्या वेगानं | वाऱ्याच्या वेगानं येऊन |
| ८४ | १७ | काया | छाया |
| ८८ | १५ | तुम्हा | तूं |

८३ १३ व्या ओळीला जोडून वाल्याच्या तोंडीं पुढील वाक्य असावें—
'या निशाचराच्या हीनपणांतून मला माणसांत आणा.'

१७ व्या पानाच्या शेवटीं नारदाच्या तोंडीं हें पद असावें.

नारद—एक हा जडला ध्यास मला
सुखदायक ती यावी जगतीं
काव्यकला उदयाला ॥ ध्रु० ॥
प्रेमभरें या प्रभुरायाची
गाइल जो प्रियलीला
भेटेल कुठें तो कवितेचा
मानकरी पहिला ॥ १ ॥

३३ व्या पानांत दहाव्या ओळीनंतर—

नारद—एक पुन्हा हा बोल खरा
सारुनि पडदा डोळ्यावरचा
सभोंवार तूं पहा जरा ॥ ध्रु० ॥
भावि सुखाची जाणुनि वार्ता
मार्ग धरी स्वहिताचा आतां
वैरी गमला अहंकार हा
हीन दशेला नेत नरा ॥ १ ॥